नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# चंद्रपूर महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ४६ * अंक ३२ * * चंद्रपूर * | शनिवार, दिनांक ०२ ऑगस्ट २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## कंगना रणौतला हायकोर्टाचा झटका

■ वृत्तसंस्था, चंदीगड, दि. १ :
हिमाचल प्रदेशच्या खासदार आणि अभिनेत्री कंगना रणौतला पंजाब-हरियाणा उच्च न्यायालयाने मोठा झटका दिला आहे. न्यायालयाने तिची मानहानीची तक्रार रद्द करण्याची याचिका फेटाळून लावली आहे.
हे प्रकरण २०२१ चे आहे, जेव्हा शेतकरी आंदोलन सुरू होते. त्या काळात कंगनाने ट्विट करून ८७ वर्षीय वृद्ध महिला शेतकरी महिंदर कौर यांना १०० रुपये घेऊन निषेधात सामील झालेल्या महिलेचे नाव दिले होते. महिंदर कौर यांनी या विरोधात न्यायालयात खटला दाखल केला होता.
उच्च न्यायालयाचा सविस्तर आदेश अद्याप आलेला नाही. हे स्पष्ट आहे की आता या प्रकरणाची सुनावणी भटिंडा न्यायालयात होईल.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## निवडणूक आयोगाचे प्रयोग

शालेय जीवनात एखादा सिद्धांत सिद्ध करावयाचा असल्यास किंवा एखादे प्रमेय सिद्ध करावयाचे असल्यास शिक्षक विद्यार्थ्यांना त्यावर प्रयोग करण्यास सांगत असत. आपल्या देशात निवडणुकीचा शिक्षक म्हणून निवडणूक आयोगाला मानावे लागेल. १९५२ सालामध्ये निवडणूक आयोगाची स्थापना झाली. देशात योग्य प्रकारे निवडणुका व्हाव्यात आणि कुठेही गैरप्रकार होऊ नयेत म्हणून निवडणूक आयोगाला सर्वाधिकार देण्यात आलेले होते. सुरुवातीला मतदार यादी तयार करण्यात आली तेव्हा त्याची पुस्तके छापण्यात येत होती. या छापलेल्या पुस्तकांना कोणालाही पाहता येत असे. तेव्हा मतदान केंद्रात जितके उमेदवार उभे असतील त्यांचे नाव आणि निवडणूक चिन्ह असलेल्या पेट्या ठेवीत असत, मतदारांना मतदान अधिकारी बोटावर शाई लावून एक कार्ड देत. हे कार्ड ज्या उमेदवाराच्या पेटीत टाकायचे असेल त्या पेटीत मतदार टाकत असे. तेव्हा काँग्रेसचे निवडणूक चिन्ह बैलजोडी होते, तर शेतकरी कामगार पक्षाचा खटारा होता, अशा प्रकारे इतरही पक्षांची वेगवेगळी चिन्हे होती. हा प्रकार १९५२ आणि १९५६ या दोन निवडणुकांमध्ये झाला. त्यावेळी अनेक मतदारांना चिरीमिरी देऊन मतपेटीत मत न टाकण्याबद्दल सांगण्यात येत होते आणि नंतर एखादा तगडा मतदार त्या मतदानाच्या खोलीत जाऊन ती मते उचलून त्याला हव्या त्या पेटीत टाकीत असे. हा प्रकार लक्षात आल्यानंतर उमेदवारांची मतपत्रिका तयार करण्यात आली आणि त्यावर शिक्का मारण्याचा पायंडा सुरू झाला. त्यामुळे प्रत्येक मतदाराला आपली घडी केलेली मतपत्रिका पेटीत टाकणे भाग पडले याचा अर्थ मतदानामध्ये गैरप्रकार तेव्हाही होत होते. हे गैरप्रकार थांबवण्याकरता निवडणूक आयोग वेगवेगळे उपाय योजत असे पण सहसा निवडणूक आयोगावर अविश्वास दाखवण्याचा प्रकार त्यावेळी कोणीही केला नव्हता. १९९० साली टी एन शेषन नावाचे निवडणूक आयुक्त रुजू झाले आणि त्यांनी आचारसंहितेचा बडगा असा काही उगारला की त्यामध्ये भलेभले गारद झाले. तत्पूर्वी १९७२ च्या निवडणुकीत इंदिराजींच्या सभेकरिता दोन ते चार हजार रुपये खर्च करून मंडप उभारण्यात आला होता आणि त्यामध्ये सरकारी नोकरीत असलेल्या यशपाल ठाकूर यांचा वाटा होता. या कारणामुळे तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची निवडणूक अलाहाबाद हायकोर्टाने रद्द ठरवली होती. बाळासाहेब ठाकरे यांनी हिंदुत्वाचा मुद्दा उचलल्यामुळे त्यांचा मताधिकार सहा वर्ष काढून घेण्यात आला होता. याचा सरळ अर्थ असा होतो की मतदान करताना गैरप्रकार होऊ नये आणि आचारसंहिता भंग होऊ नये म्हणून निवडणूक आयोग दक्ष असायचा. हाच आयोग आता आरोपांच्या कचाट्यात का सापडला आहे, या आयोगावर विरोधी पक्ष वारंवार का आरोप करत आहेत. तसेच निवडणूक आयोगाचे कर्मणी, कर्तरी आणि भावे प्रयोग कसे चालताहेत, याला जबाबदार कोण आहे. यासाठी विरोधी पक्ष प्रश्नावर प्रश्न विचारीत आहे परंतु, लाख आहेत प्रश्न माझे एकही नाही उत्तर अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. याला निवडणूक आयोगाचे आयुक्त जबाबदार आहेत असे कोणीही म्हणणार नाही. निवडणूक आयोग नवनवीन प्रयोग करण्यात मग्न असतो. एखाद्या राज्यात मतदानामध्ये प्रचंड वाढ होते तर दुस?या राज्यात कोट्यावधी मतदारांना मतदानापासून वंचित करण्यात येते. निवडणूक आयोग पक्षपाती नसावा आणि समजा तो तसा असला तरी तो दिसू तरी नये, ही जनतेची अपेक्षा निवडणूक आयोगाला पूर्ण करता आली पाहिजे. साधी मतदारांची यादी वारंवार मागूनही निवडणूक आयोग का देत नाही याचा खुलासाही झाला पाहिजे. या देशात अत्यंत शुद्ध हेतूने निवडणूक आयोग निवडणुका घेतो हे दिसले पाहिजे. निवडणूक आयोगाचे प्रमुख आयुक्त असलेले कुमार राजेश आणि कुमार ज्ञानेश या दोन्ही कुमारांपैकी पहिले कुमार राजेश तर आता सेवानिवृत्त झालेले आहेत, आताच्या कुमारांनी आपल्या ज्ञानेश या नावाप्रमाणे ज्ञानेशाही करून आपला स्वच्छपणा स्पष्टपणे दाखवून द्यावा, अशी भारतातील भोळ्या भावड्या परंतु अत्याधिक हुशार मतदारांची मागणी आहे. निवडणूक आयोग जनतेच्या मतदानाचे प्रतिबिंब देशासमोर आणत आहे हे जनतेच्या आरशामध्ये दिसले पाहिजे. जर थोडी शेषनगिरी शेष ठेवली तर आताचे आयुक्तही विशेष सन्मानास पात्र होतील, एवढेच आम्हाला सांगायचे आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# ट्रम्पचा टॅरिफ टळला !

९० देशांनाही दिलासा ■ कॅनडावर आजपासून ३५% टॅरिफ ■ लिस्टमध्ये चीन नाही

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १ :
अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावरील २५% टॅरिफ ७ दिवसांसाठी पुढे ढकलला आहे. हा आजपासून लागू होणार होता, जो आता ७ ऑगस्टपासून लागू होईल.
ट्रम्प यांनी ९२ देशांवरील नवीन टॅरिफची यादी जाहीर केली आहे. यामध्ये भारतावर २५% आणि पाकिस्तानवर १९% कर लादण्यात आला आहे. तथापि, आजपासून कॅनडावर ३५% कर लागू करण्यात आला आहे.
दक्षिण आशियातील सर्वात कमी कर पाकिस्तानवर लादण्यात आला आहे. अमेरिकेने यापूर्वी पाकिस्तानवर २९% कर लादला होता. त्याच वेळी, जगातील सर्वाधिक ४१% कर सीरियावर लादण्यात आला आहे. चीनचे नाव या यादीत समाविष्ट नाही.




यापूर्वी, ट्रम्प यांनी २ एप्रिल रोजी जगभरातील देशांवर टॅरिफ लादण्याची घोषणा केली होती, परंतु केवळ ७ दिवसांनी ती ९० दिवसांसाठी पुढे ढकलली. काही दिवसांनी ट्रम्प यांनी ३१ जुलैपर्यंत वेळ दिला.
यानंतर, ट्रम्प सरकारने ९० दिवसांत ९० करार करण्याचे लक्ष्य ठेवले. तथापि, आतापर्यंत फक्त ७ देशांसोबत करार झाले आहेत. ऑर्डर लागू होण्यापूर्वी ज्या वस्तू अमेरिकेत जातील त्यांना जुन्या नियमांनुसार कर भरावा लागेल. यासाठी ५ ऑक्टोबर २०२५ ही शेवटची तारीख आहे.
ट्रम्प यांनी ३१ जुलै रोजी भारतावर २५% कर लादण्याची घोषणा केली होती. हा कर ७ ऑगस्टपासून लागू होईल. आतापर्यंत अमेरिका भारतावर १०% बेसलाइन कर लादत आहे. रशियाकडून शस्त्रे आणि तेल खरेदी केल्याबद्दल भारतावर दंड आकारण्यात येईल, असे अमेरिकेने म्हटले आहे. भारताच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने सांगितले की, राष्ट्रीय हितांचे रक्षण करण्यासाठी ते सर्व आवश्यक पावले उचलतील.

## ९ सप्टेंबरला होणार उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक

२१ ऑगस्टपर्यंत उमेदवारी दाखल करता येणार

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १ :
उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक ९ सप्टेंबर रोजी होणार आहे. उपराष्ट्रपतीपदासाठी २१ ऑगस्टपर्यंत नामांकन दाखल केले जाईल. जगदीप धनखड यांनी २१ जुलैच्या रात्री अचानक उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा दिला.राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी २२ जुलै रोजी धनखड यांचा राजीनामा स्वीकारला.
उपराष्ट्रपती धनखड २१ जुलै रोजी राज्यसभेच्या कामकाजाला उपस्थित राहिले. त्यानंतर, त्यांनी प्रकृती अस्वास्थ्याचे कारण देत संध्याकाळी राजीनामा दिला.
उपराष्ट्रपतीची निवड ६ टप्प्यांत होते. उपराष्ट्रपतीची निवड लोकसभा आणि राज्यसभेच्या सर्व निवडून आलेल्या आणि नामनिर्देशित सदस्यांच्या निवड मंडळाद्वारे केली जाते. टप्पा २ मध्ये निवडणूक अधिसूचना जारी करण्याचा समावेश आहे. टप्पा ३ अंतर्गत उमेदवाराला उमेदवारी अर्ज दाखल करावा लागतो. त्यावर प्रस्तावक म्हणून किमान २० खासदार आणि समर्थक म्हणून २० खासदारांची स्वाक्षरी असावी लागते. टप्पा ४ मध्ये खासदारांमध्ये प्रचार होतो. फक्त खासदार मतदार असतात. म्हणून हा प्रचार मर्यादित चौकटीत होतो. उमेदवार आणि त्यांचे समर्थक पक्ष प्रचारात सहभागी होतात.
टप्पा ५ मध्ये मतदान प्रक्रिया सुरू होते. प्रत्येक खासदार उमेदवारांना मतपत्रिकेवर १, २, ३ या पसंतीच्या क्रमाने चिन्हांकित करतात. टप्पा ६ मध्ये मतांची मोजणी आणि निकाल जाहीर केला जातो.
लोकसभेतील एकूण ५४२ सदस्यांपैकी एनडीएचे २९३ आणि इंडिया अलायन्सचे २३४ सदस्य आहेत. राज्यसभेतील २४० सदस्यांच्या प्रभावी संख्येपैकी, एनडीएला सुमारे १३० खासदारांचा पाठिंबा आहे आणि इंडिया अलायन्सला ७९ खासदारांचा पाठिंबा आहे. एकूणच, एनडीएला ४२३ खासदारांचा पाठिंबा आहे आणि इंडिया ब्लॉकला ३१३ खासदारांचा पाठिंबा आहे. उर्वरित सदस्य कोणत्याही गटाशी संलग्न नाहीत.

## अधिकाऱ्यांकडून मतांची चोरी

राहुल गांधींचा आरोप : आयोग म्हणाले दुर्लक्ष करा

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १ :
काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी गेल्या ९ दिवसांत दुसऱ्यांदा निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांना धमकी दिली आहे. शुक्रवारी संसदेबाहेर पडताना राहुल माध्यमांशी बोलताना म्हणाले की, निवडणूक आयोग मते चोरत आहे.



आमच्याकडे अणुबॉम्ब आहे. जेव्हा त्याचा स्फोट होईल तेव्हा निवडणूक आयोग वाचणार नाही.
निवडणूक आयोगात मते चोरणाऱ्यांना आम्ही सोडणार नाही. तुम्ही भारताविरुद्ध काम करत आहात, जो देशद्रोह आहे. तुम्ही कुठेही असाल, जरी तुम्ही निवृत्त झालात तरी आम्ही शोधून काढू.
यापूर्वी २४ जुलै रोजी राहुल म्हणाले होते की, मी निवडणूक आयोगाला एक संदेश देऊ इच्छितो. जर तुम्हाला वाटत असेल की तुम्ही यातून सुटाल, जर तुमच्या अधिकाऱ्यांना वाटत असेल की ते सुटतील, तर हा तुमचा गैरसमज आहे. आम्ही तुम्हाला जाऊ देणार नाही.
दुसरीकडे, निवडणूक आयोगाने त्यांच्या अधिकाऱ्यांना सांगितले की अशा धमक्यांना घाबरू नका, त्याकडे दुर्लक्ष करा .

## ब्रिटनकडून भारताचा दमनकारी देशांच्या यादीत समावेश

■ वृत्तसंस्था, लंडन, दि. १ :
ब्रिटिश संसदीय समितीने दमनकारी देशांची यादी जाहीर केली, ज्यामध्ये भारताचे नावदेखील समाविष्ट आहे. 'ट्रान्सनॅशनल रिप्रेशन इन द यूके' या शीर्षकाच्या या यादीत १२ देशांचा समावेश आहे.
अहवालात म्हटले आहे की काही परदेशी सरकारे यूकेमध्ये राहणाऱ्या लोकांना धमकावण्याचा आणि त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहेत.
समितीने यूकेमधील परदेशी सरकारांच्या कारवाया मानवी हक्कांसाठी धोका असल्याचे म्हटले आणि यावर ब्रिटिश सरकारकडून कारवाईची मागणी केली. भारताने अद्याप यावर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही.

## नक्षल्यांचा धाक झुगारत ग्रामस्थांकडून बंदूका पोलिसांच्या स्वाधीन

■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि.१:
२८ जुलै ते ३ ऑगस्ट दरम्यान नक्षल्यांकडून राबविल्या जाणाऱ्या नक्षल सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात नक्षल विरोधी अभियान तीव्र करण्यात आले आहे. उपविभाग जिमलगट्टा अंतर्गत उपपोस्टे दामरंचा हद्दीतील नागरिकांनी पोलिसांप्रति विश्वास दाखवत नक्षल्यांच्या भीतीला झुगारून ३ भरमार व १ बॅरेल पोलिसांच्या स्वाधीन केले.
जिल्ह्यात जंगलक्षेत्र असल्यामूळे येथील दुर्गम-अतिदुर्गम भागातील नागरिक शेती व्यवसायासोबतच शिकार करून उदरनिर्वाह करीत असत. शिकार तसेच वन्य प्राण्यांपासून संरक्षणासाठी अनेकजण बंदूका बाळगायचे. याचा फायदा घेऊन, सामान्य जनतेला माओवादी चळवळीत समाविष्ट करण्याचा प्रयत्न करतात. स्वतःजवळ बाळगलेल्या बंदूका स्वेच्छेने गडचिरोली पोलीस दलाकडे स्वाधिन करण्याचे आवाहन पोलिस प्रशासनाने केले होते.



त्याअन्वये दामरंचा हद्दीतील नागरिकांनी ३ बंदूका व १ बॅरेल गडचिरोली पोलीसांच्या स्वाधीन केले आहे.
उपपोस्टे दामरंचा येथील प्रभारी अधिकारी पोउपनि पृथ्वीराज बाराते, पोउपनि अनिकेत संकपाळ, अंमलदार यांनी राबविलेल्या प्रभावी उपक्रमांमूळे दामरंचा हद्दीतील नागरिक मुख्य प्रवाहामध्ये सामिल होताना दिसून येत आहेत. २०२२ मध्ये ७३, २०२३ मध्ये ४६ व २०१४ मध्ये एकूण २६ भरमार बंदूका जिल्ह्यातील नागरिकांनी गडचिरोली पोलीस दलासमक्ष स्वाधीन केलेल्या होत्या. नक्षल सप्ताहादरम्यान नागरिकांनी दाखविलेला विश्वास आणि साहसाबद्दल पोलीस अधीक्षक गडचिरोली नीलोत्पल यांनी नागरिकांचे अभिनंदन केले आहे.

## यवतमध्ये हिंसाचार, मुख्यमंत्र्यांचा संताप

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १ :
पुण्यातील यवत गावात एका आक्षेपार्ह पोस्टवरून सुरू झालेल्या वादाचे रूपांतर हिंसक हाणामारीत झाले होते. पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या आणि अतिरिक्त सुरक्षा दल तैनात केले आहे.
मुख्यमंत्री फडणवीस यांनी या बाबत दोषींवर कठोर कारवाई करणार असल्याचा इशारा दिला आहे. सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे आणि दोषींवर कठोरात कठोर कारवाई केली जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. नागरिकांनी शांतता राखण्याचे आवाहन देखील त्यांनी केले.
फडणवीस म्हणाले की, काही लोक जाणूनबुजून तणाव निर्माण करण्यासाठी असे स्टेटस, पोस्ट करतात, परंतु त्यांच्यावर निश्चितच कठोर कारवाई केली जाईल. केवळ एखादा मेळावा किंवा कार्यक्रम झाला म्हणून, अशा प्रकारचे प्रक्षोभक स्टेटस पोस्ट करण्याचे स्वातंत्र्य कोणालाही मिळते का? कोणत्याही धर्माविरुद्ध अशा प्रकारे आक्षेपार्ह टिप्पण्या करण्याचा कोणालाही अधिकार नाही. सार्वजनिक मेळाव्या मुळे तणाव निर्माण झाला असे म्हणणे पूर्णपणे चुकीचे आहे.
मुख्यमंत्री म्हणाले की, सध्या हा परिसर पूर्णपणे शांत आहे. व्हिडिओ क्लिप त्याच ठिकाणची आहे की इतरत्र आहे याची पडताळणी करावी लागेल. अशा अनेक प्रकरणांमध्ये छेडछाड केलेले व्हिडिओ देखील समोर येतात. म्हणून, त्या पैलूची देखील चौकशी केली पाहिजे, असेही ते म्हणाले.
वास्तविक संतापजनक मोर्चा, बाजारपेठ बंद, रस्त्यावर गर्दी, जाळपोळ आणि नंतर पोलिसांचा मोठा बंदोबस्त या ठिकाणी लावण्यात आला आहे. एका व्हॉट्सॲपवरील पोस्टमध्ये पुण्यातील दौंड तालुक्यातील यवतमध्ये मोठा तणाव निर्माण झाला होता. शुक्रवारी जातीय वातावरण बिघडल्यानंतर यवतमध्ये मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.



**अजित पवार यांची घटनास्थळी भेट**

पुण्याच्या दौंड तालुक्यातील यवत येथे दोन गटांत जातीय तणाव निर्माण झाला होता. व्हॉट्सॲपवरील एका आक्षेपार्ह पोस्टमुळे हा वाद भडकला होता. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी तातडीने यवत गाठले, त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांची बैठक घेत स्थिती नियंत्रणात आणण्याचे आदेश दिले.

## बलात्कार : माजी खासदार प्रज्वल रेवण्णा दोषी

■ वृत्तसंस्था, म्हैसूर, दि. १ :
बंगळुरूमधील एका विशेष न्यायालयाने शुक्रवारी माजी जेडीएस खासदार आणि माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचा नातू प्रज्वल रेवण्णा याला मोलकरीण बलात्कार प्रकरणात दोषी ठरवले. न्यायालय शनिवारी शिक्षा सुनावणार आहे. न्यायालयाचा निकाल जाहीर झाला तेव्हा रेवण्णा भावनिक झाला आणि बाहेर पडताना ढसाढसा रडला.



## शाहरुख प्रथमच बेस्ट ॲक्टर

'श्यामची आई' सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट
नाळ २ चा भार्गव सर्वोत्कृष्ट बाल कलाकार

राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. १ :
शुक्रवारी दिल्लीत ७१ व्या राष्ट्रीय पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. शाहरुख खानला 'जवान' चित्रपटासाठी आणि विक्रांत मेस्सीला '१२ वी फेल' चित्रपटासाठी संयुक्तपणे सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार देण्यात आला आहे.
मराठी चित्रपटांसाठी 'श्यामची आई' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा पुरस्कार मिळाला आहे. त्यासोबतच नाळ २ चित्रपटातील भार्गव जगतापला सर्वोत्कृष्ट बाल कलाकाराचा पुरस्कार मिळाला आहे.
राणी मुखर्जीला 'मिसेस चॅटर्जी व्हर्सेस नॉर्वे' चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार देण्यात आला आहे. कटहलला सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपटाचा पुरस्कार देण्यात आला आहे.
'सिर्फ एक बंदा काफी है' या हिंदी चित्रपटाला सर्वोत्कृष्ट संवादाचा पुरस्कार मिळाला आहे. या चित्रपटाचे संवाद दीपक किंगराणी यांनी लिहिले आहेत.
सर्वोत्कृष्ट सिनेमॅटोग्राफी - द केरल स्टोरी
सर्वोत्कृष्ट बालकलाकार- सुकीर्थी वेणी (गांधी कथा चेतू), कबीर खंदारे (जिप्सी), त्रिशा तोसर, श्रीनिवास पोकळे आणि भार्गव जगताप (नाळ २)
सर्वोत्कृष्ट पार्श्वगायक - पीव्हीएनएस रोहित, तेलुगु (बेबी)
सर्वोत्कृष्ट महिला पार्श्वगायिका - चलेया (जवान), शिल्पा राव
सर्वोत्कृष्ट संवाद लेखक - दीपक किंगराणी (सिर्फ एक बंदा कॉफी है)









सर्वोत्कृष्ट पटकथा - बेबी (तेलुगु), पार्किंग (तमिळ)

**नॉन फिचर फिल्म विजेते**

सर्वोत्तम विशेष उल्लेख नॉन फिचर फिल्म पुरस्कार - नेकल (मल्याळम)
सर्वोत्तम संगीत नॉन फिचर फिल्म - द फर्स्ट फिल्म (हिंदी)
सर्वोत्तम एडिटिंग नॉन फिचर फिल्म पुरस्कार - मूव्हिंग फोकस
सर्वोत्तम साउंड डिझाइन नॉन फिचर फिल्म पुरस्कार - धुंधगिरी के फूल (हिंदी)
सर्वोत्तम सिनेमॅटोग्राफी नॉन फिचर फिल्म पुरस्कार - लिटिल विंग्स (तमिळ)
सर्वोत्तम दिग्दर्शक नॉन फिचर फिल्म पुरस्कार - पियुष ठाकूर, द फर्स्ट फिल्म (हिंदी)
सर्वोत्तम लघुपट नॉन फिचर फिल्म पुरस्कार - गिद्ध द स्कॅव्हेंजर (हिंदी)
सर्वोत्तम नॉन फिचर फिल्म प्रमोटिंग सोशल कन्सर्न पुरस्कार - द सायलेंट एपिडेमिक (हिंदी)
सर्वोत्तम माहितीपट पुरस्कार - गॉड व्हल्चर अँड ह्युमन (इंग्रजी)
सर्वोत्तम कला/संस्कृती नॉन फिचर फिल्म पुरस्कार - टाईमलेस तमिळनाडू (इंग्रजी)
सर्वोत्तम नॉन फिचर फिल्म पुरस्कार - द फ्लॉवरिंग मॅन (हिंदी)
प्रादेशिक भाषेतील
सर्वोत्कृष्ट गुजराती चित्रपट- वाश
सर्वोत्कृष्ट बंगाली चित्रपट- डीप फ्रीज
सर्वोत्कृष्ट आसामी चित्रपट- रोंगाटापू
सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपट- कथल
सर्वोत्कृष्ट कन्नड चित्रपट- कंडीलू
यांना पुरस्कार जाहीर झाले.

# कृषी काढले, क्रीडा दिले : कोकाटेंचा पत्त्यांचा गेम संपला !

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.१:
राज्य मंत्रिमंडळात अचानक केलेल्या खातेबदलामुळे राजकीय वर्तुळत मोठी खळबळ उडाली आहे. वादग्रस्त कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडील कृषी खाते काढून घेतले असून त्यांच्याकडे आता क्रिडा खाते देण्यात आले आहे. तर क्रिडा मंत्री दत्तात्रेय भरणे यांच्याकडे कृषी खात्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.
हा फेरबदल म्हणजे केवळ प्रशासकीय निर्णय नाही, तर राजकीय शिस्तीचा इशारा मानला जातो. कोकाटे यांच्या विधानभवनातील पत्त्यांच्या खेळाचा व्हिडिओ, शेतकऱ्यांबाबत वादग्रस्त विधानं आणि लोकभावनेचा रोष यामुळे सरकारवर दबाव वाढला होता. या निर्णयामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटातील इतर वादग्रस्त मंत्र्यांचे भय वाढले आहे.
गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यावर त्यांच्या आईच्या नावे डान्सबार परवाना असल्याचा आरोप आहे. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या खोलीत सापडलेल्या पैशाच्या बॅगेचा व्हिडिओ सार्वजनिक झाला आहे.
या दोघांनाही शिंदे यांनी अभय दिला होता. पण आता कोकाटेंवर कारवाई झाल्यानंतर शिंदे यांच्यावरही दबाव वाढला असून, न्याय एकसंध असावा अशी भूमिका विरोधकांसह सत्ताधारी गटातही जोर धरू लागली आहे.



**निर्णयाचा सूत्रधार कोण?**

खातेबदलाच्या निर्णयाबाबत एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले की, हा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळावा, हीच सरकारची भूमिका असल्याचेही त्यांनी सांगितले.
दरम्यान, उपमुख्यमंत्री शिंदे यांनी नुकतीच दिल्लीला अचानक भेट दिली होती. याआधी मंत्री शंभूराज देसाई आणि उदय सामंत यांचेही दिल्लीत चक्र सुरु होते. येणाऱ्या महापालिका निवडणुकीत जागावाटप आणि शिवसेनेचा वाटा वाढवण्याच्या चर्चांसाठी हे दौरे झाल्याचा अंदाज आहे.

**आय एम व्हेरी हॅपी**

विधिमंडळात ऑनलाईन रमी खेळण्याप्रकरणी सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माणिकराव कोकाटे यांची कृषिमंत्रीपदावरून उचलबांगडी करण्यात आली आहे. यामुळे ते काहीसे नाराज झाल्याची चर्चा होती. पण कोकाटेंनी स्वतः आपण नाराज नसून, आनंदी असल्याचे ठणकावून सांगितले आहे. नेतृत्वाने जो काही निर्णय तो मला मान्य आहे, असेही ते म्हणालेत.
राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचा राजीनामा न घेता केवळ त्यांच्याकडील कृषिमंत्रिपदाचा पदभार काढून घेतला. दुसरीकडे खातेबदलावरून विरोधकांचे टीकास्त्र डागणे सुरूच आहे.

## रमी खेळल्याचे बक्षीस म्हणजे क्रीडा मंत्रालय?
# सुप्रिया सुळेंची टीका



**मुंबई :** राज्यातील कृषी क्षेत्र कोलमडून पडलेले असताना आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबत नसताना, अशा संवेदनशील काळात कृषिमंत्री असलेल्या माणिकराव कोकाटे विधिमंडळात 'रमी' खेळताना दिसले. यावरूनच त्यांची संवेदनशीलता किती आहे हे स्पष्ट होते, असा घणाघातच खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. ट्विटर ( ) वर पोस्ट करत त्यांनी कोकाटे यांच्यावर आणि त्यांच्या समर्थनार्थ उभ्या असलेल्या सरकारवर कठोर शब्दांत टीका केली. "विधिमंडळात रमी खेळण्याचे बक्षीस म्हणून कोकाटे यांना क्रीडा व अल्पसंख्याक विकास खाते देणे, म्हणजे राज्याच्या प्रतिष्ठेची विटंबना" असे म्हणत त्यांनी मुख्यमंत्र्यांना राजीनाम्याची मागणी केली. याचबरोबर त्यांनी हेही म्हटले की, ज्या मंत्र्यांनी महाराष्ट्राला 'भिकारी' म्हटले त्या मंत्र्यांना नारळ द्यावा, असा सल्ला मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना दिला.

# चोरीचा माल परत केला म्हणजे चोर सुटत नसतो : अनिल परब



**मुंबई :** गृह राज्यमंत्री योगेश कदम यांच्या अडचणी वाढत आहेत. विधान परिषदेचे सदस्य आणि उद्धव सेनेचे नेते अनिल परब यांनी राज्यमंत्री कदम यांच्यावर लावलेल्या आरोपांशी संबंधित पुरावे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले होते. गृह राज्यमंत्र्यांच्या आईच्या नावाने डान्स बार सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला होता. मात्र, त्यानंतर आता कदम यांच्या या बारमधील ऑर्केस्ट्राचा परवाना परत जमा करण्यात आला आहे. चोराने चोरीचा माल परत केला म्हणजे तो सुटत नसतो. तर त्या ठिकाणी चोरी झाली हे सिद्ध होत असल्याचे परब यांनी म्हटले आहे. यावरुन कदम यांच्या राजीनाम्याची मागणी देखील परब यांनी केली आहे. कदम यांच्या बारचा परवाना परत केला याचा अर्थ या प्रकरणातून त्यांची सुटका होत नाही. परवाना परत केला म्हणजेच त्यांच्या बार मध्ये अवैध काम चालू होते, हे त्यांनी मान्य केले आहे. जर त्यांच्याकडे वैद्य काम चालू असते तर त्यांनी परवाना परत करण्याचे काय कारण होते? असा प्रश्न परब यांनी विचारला आहे.

# कृषी मंत्रिपद माझ्याकडे देऊ केलं होते : छगन भुजबळ



**मुंबई :** राज्याच्या कृषी विभागात रंगलेलं 'रमी-राजकारण' आता चांगलंच तापलेलं आहे. कृषी खाते माणिकराव कोकाटे यांच्या हातून गेल्यानंतर, आता छगन भुजबळ यांच्या ताज्या वक्तव्याने राज्यात नवा राजकीय भूकंप झाला आहे. अजित पवारांनी मला स्वतः कृषी खात्याची ऑफर दिली होती, असा भुजबळांचा थेट गौप्यस्फोट झाल्याने, अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी विधानसभेत सादर केलेल्या रमी खेळणाऱ्या व्हिडिओमुळे कोकाटेंवर चौफेर टीका झाली. विरोधकांनी त्यांचा राजीनामा मागितला. सरकारने तात्काळ हालचाल करत, कृषी मंत्रालयाची जबाबदारी काढून घेतली आणि दत्तात्रय भरणे यांची नव्या कृषीमंत्रीपदी नियुक्ती केली.

## महाराष्ट्राचा राज्य खेळ म्हणून रम्मी जाहीर करा
# सचिन सावंतांचा सरकारला टोला



**मुंबई :** कृषी खात्यातून दूर करत माणिकराव कोकाटे यांच्याकडे क्रीडा विभाग सोपवल्या नंतर राज्य सरकारवर टीकेचा वर्षाव सुरु झाला आहे. विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आणि काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत यांनी उपरोधिक शैलीत सरकारच्या निर्णयावर जोरदार हल्ला चढवला आहे. अंबादास दानवे यांनी कवितेच्या ओळींमधून कोकाटे यांच्या नव्या जबाबदारीवर आणि सरकारच्या धोरणांवर उपहासात्मक टीका केली. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी वर पोस्ट करत म्हटलंय की, विकूनी टाका खेळणे भंगाराच्या गाडीवर, नवे मंत्री देणार पत्त्यांचे कॅट आता डझनावर शेतकऱ्यांची झाली, आता खेळाडूंची उपेक्षा,पदके नाही, 'रम्मी'कडूनच बक्षिसांची अपेक्षा माफी मागा पुन्हा बरळा, हा फंडा चांगलाय,डर कशाला कोणाचा, बॉस वर्षा बंगल्यावर बसलाय वेडे-वाकडे बोलणे-वागणे टिकवी मंत्र्यांचा 'ताज',आता नको मैदान, रम्मी खेळायला बसा महाराज असे म्हणत माणिकराव कोकाटे यांना दिलेल्या क्रीडा खात्यावरून टीका केली आहे. महाराष्ट्राचा अधिकृत राज्य खेळ म्हणून जंगली रमीला मान्यता मिळाली तर हरकत नको. नाहीतरी नवीन क्रीडा मंत्र्यांच्या तो आवडीचा खेळ आहे. दिवसातील बराच काळ ते याचा सराव करतात.

# मी आता मोकळा, गद्दारी केली तर बसून कार्यक्रम करेन : जयंत पाटील



**सांगली :** राज्यातील राजकारण तापले असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी स्वपक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना अत्यंत आक्रमक भाषेत इशारा दिला आहे. 'ज्यांना सत्ताधाऱ्यांच्या पक्षात जायचे आहे, त्यांनी आताच जावे. पण ऐन निवडणुकीच्या वेळी जाऊन कोंडी करायचा प्रयत्न करू नका, अन्यथा मी मोकळाच आहे, बसून तुमचा कार्यक्रम लावीन, अशा कठोर शब्दांत त्यांनी स्वकीयांना दम भरला आहे. त्यांच्या या भूमिकेने महायुतीच्या नेत्यांसह पक्षातून बाहेर पडण्याच्या तयारीत असलेल्यांमध्ये ही खळबळ उडाली आहे. जयंत पाटील म्हणाले की, मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांनी ज्या चुका केल्या त्या मान्य आहेत, असे मुख्यमंत्र्यांनी यातून महाराष्ट्रातील लोकांना सांगितले आहे.

कोण कुठल्या खात्याचा मंत्री याला फार महत्त्व नसते. पण लोकांना आक्षेपार्ह वाटेल अशा गोष्टी माननीय मुख्यमंत्री यांनी करणे म्हणजे याचा अर्थ त्यांना या गोष्टी मान्य केल्या आहेत, असे म्हणत त्यांनी महायुतीच्या सरकारवर अप्रत्यक्ष टीका केली. जयंत पाटील म्हणाले की, ज्यांना थांबायचे आहे ते थांबतील, बाकीचे जातील. पण थोडं थांबा आणि बघा पुढे काय होतंय, असा थेट इशाराच पक्ष फोडणाऱ्यांना आणि जाणाऱ्यांना दिला आहे. पक्षातील अनेक जण सत्ताधाऱ्यांच्या संपर्कात असल्याच्या चर्चांवर त्यांनी स्पष्ट भूमिका घेतली. ते म्हणाले की, ज्यांना जायचे आहे त्यांनी आताच पक्ष सोडून जावे.

## एक लाख कोटी डॉलर्सच्या अर्थव्यवस्थेसाठी सहाय्य करावे
# मुख्यमंत्र्यांचे अशियाई बँकेला आवाहन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :**
देशाची पाच लाख कोटी डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट साध्य करण्यात महाराष्ट्राने सिंहाचा वाटा उचलला आहे. राज्याची अर्थव्यवस्था एक लाख कोटी डॉलर्सची करण्यासाठी वेगवान वाटचाल सुरू असून आशियाई पायाभूत सोयी सुविधा गुंतवणूक बँकेने २०४७ पर्यंत विकसित महाराष्ट्राचे स्वप्न साकारण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी केले.




आशियाई पायाभूत सुविधा गुंतवणूक बँकेच्या इन्व्हेस्टमेंट सोल्युशनचे उपाध्यक्ष अजय भूषण पांडे यांच्या समवेत सह्याद्री अतिथी गृह येथे आयोजित बैठकीत फडणवीस बोलत होते. मुख्य सचिव राजेश कुमार मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, बँकेचे वरिष्ठ गुंतवणूक अधिकारी प्रत्युश मिश्रा, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त संजय मुखर्जी, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी गुप्ता आदींसह विविध विभागांचे अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव उपस्थित होते.

विकसित महाराष्ट्राचा आराखडा तीन टप्प्यात तयार करण्यात येत आहे. यामध्ये अल्पकालीन, मध्यमकालीन व दीर्घकालीन उद्दिष्ट ठेवण्यात आले आहेत. राज्यात पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांची कामे वेगाने सुरु आहेत. अनेक प्रकल्प प्रस्तावित आहेत. यात अनेक वित्तीय संस्थांची मदत लागणार आहे. या प्रकल्पांसाठी आशियाई पायाभूत सुविधा गुंतवणूक बँकेसारखी संस्था स्वतःहून महाराष्ट्राच्या पाठीशी असल्याबाबत मुख्यमंत्र्यांनी आनंदही व्यक्त केला.

राज्यातील नऊ मोठे प्रकल्प नीती आयोग व वित्त मंत्रालयाला सादर करण्यात आले आहेत. राज्यामध्ये नदीजोड प्रकल्पाची मोठ्या प्रमाणात आखणी करण्यात आली आहे, त्यासाठी सुद्धा वित्त सहाय्य लागणार आहे. राज्यात पाच नदी जोड प्रकल्प राबविण्यात येत आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये अमूलाग्र बदल घडवून आणणाऱ्या वैनगंगा- नळगंगा - पैनगंगा नदीजोड प्रकल्पाचे सर्वेक्षण अंतिम टप्प्यात आहे. या प्रकल्पाचा लाभ केवळ शेतीलाच होणार नसून उद्योगधंद्यांनाही होणार आहे. यासोबतच दमणगंगा - गोदावरी नदी जोड प्रकल्पामुळे समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्यातल्या गोदावरी खोऱ्यात आणण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पंप स्टोरेज योजनेच्या माध्यमातून एक लाख मेगावॅट ऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पंप स्टोरेज क्षेत्रात अनेक खासगी कंपन्या सुद्धा आहेत. त्या कंपन्यांना बँकेशी जोडून देण्यात येईल. यातून विकसित महाराष्ट्र संकल्पनेसाठी मोठी मदत होणार आहे, असेही फडणवीस यांनी सांगितले.

शेतकऱ्यांसाठी सौरऊर्जेचे अनेक प्रकल्प हाती घेतले आहेत. त्यासाठी राज्याला बँकेची मदत लागणार आहे. सौरऊर्जेवर आधारित कृषी पंप योजना युद्ध पातळीवर राबविण्यात येत आहे. ही योजना देशासाठी दिशादर्शक ठरली असून अन्य राज्यांमध्येही त्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे. प्रत्येक वर्षी सौरऊर्जेवर आधारित तीन ते चार लाख कृषी पंप बसविण्यात येणार आहे. शहरांमध्ये गतिमान दळण वळणसाठी भुयारी व उन्नत मेट्रो, भुयारी मार्ग, सागरी किनारा रस्ता आदी प्रकल्प हाती घेण्यात आल्याचे फडणवीस यांनी सांगितले. यावेळी बँकेचे उपाध्यक्ष अजय भूषण पांडे यांनी बँकेच्या आशिया आणि जगात चालू असलेल्या प्रकल्पांबाबत माहिती दिली. तसेच राज्यात सुरू असलेल्या प्रकल्पांना व भविष्यातील प्रकल्पांसाठी मदत करण्याची ग्वाही दिली.

## राज्यातील ६५ सहाय्यक पोलीस आयुक्तांच्या बदल्या

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :**
गृह विभागाने राज्यातील पोलीस दलात कार्यरत ६५ सहाय्यक पोलीस आयुक्त आणि पोलीस उपअधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या. त्यात मुंबईतील नऊ सहाय्यक पोलीस आयुक्तांचा समावेश आहे. गृह विभागाने सहाय्यक पोलीस आयुक्तांच्या बदल्यांचे आदेश गुरूवारी रात्री जारी केले. त्यात मुंबईतील सहाय्यक पोलीस आयुक्त रेणुका बागडे, शशिकांत भोसले, सचिन जायभाय, मनिषा रावखंडे, कुसुम वाघमारे, योगेश गावडे, भागवत सोनावणे, शैलेश सणस, प्रिया पाटील, तसेच पोलीस उपधीक्षक निलम व्हावळ आदी अधिकाऱ्यांचा समावेश आहे. ठाण्यातील सहाय्यक पोलीस आयुक्त उत्तम कोळेकर, ममता डिसुझा, मिरा भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालयातील दीपाली खन्ना, विजयकुमार मराठे आदी अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. सहाय्यक पोलीस आयुक्त तानाजी बर्डे (पुणे ग्रामीण), उत्तम कोळेकर (ठाणे) यांची मुंबईत बदली करण्यात आली आहे.

# कुणीच दोषी नाही, मग ६ जणांना कुणी मारले?
## आंबेडकरांचा मालेगाव ब्लास्टच्या निकालावर सवाल



**मुंबई :** वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात विशेष एनआयए न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर संशय व्यक्त केला आहे. प्रस्तुत प्रकरणात कुणीच दोषी नसेल, तर मग 6 जणांचा बळी कुणी घेतला? असा खडा सवाल त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे. आंबेडकरांनी यासंदर्भात एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास यंत्रणेने बदलेलल्या भूमिकेवरही बोट ठेवले आहे. 29 सप्टेंबर 2008 रोजी मालेगावच्या भिकू चौकात एका दुचाकीवर स्फोट झाला होता. त्यात 6 जण ठार, तर 90 हून अधिक जण जखमी झाले होते. विशेष एनआयए कोर्टाने या प्रकरणाचा गुरूवारी निकाल दिला. त्यात भाजपच्या माजी खासदार साध्वी प्रज्ञासिंह, कर्नल प्रसाद पुरोहित, रमेश उपाध्याय, अजय राहिरकर, सुधाकर चतुर्वेदी, समीर कुलकर्णी व सुधाकर धर द्विवेदी या सर्व 7 आरोपींची निर्दोष सुटका करण्यात आली. या पार्श्वभूमीवर प्रकाश आंबेडकर यांनी शुक्रवारी एका ट्विटद्वारे उपरोक्त सवाल केला आहे. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात कुणीच दोषी नसेल, तर या प्रकरणी बॉम्बस्फोटांचा कट कुणी रचला व ते स्फोट कुणी घडवले? 6 जणांची हत्या कुणी केली? एनआयएने तपास सुरू असताना आपली भूमिका का बदलली? या प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत, तोपर्यंत सत्य कधीच बाहेर येणार नाही. दिवंगत आयपीएस हेमंत करकरे यांच्या नेतृत्वातील दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) सुरू केलेल्या तपासाचे दस्तऐवज कुठे आहेत? आरोपींच्या बैठकीची माहिती असलेल्या काही सेवारत लष्करी अधिकाऱ्यांसह बहुतांश साक्षीदार अखेर न्यायालयात का उलटले? हे साक्षीदार सुरुवातीला खोटे बोलत असतील.

## पदाधिकाऱ्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधू नये
# मेळाव्यात राज ठाकरे यांचे कडक निर्देश

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :**
आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांना मेळावा घेतला. या वेळी प्रकृती खराब असल्याने आज आपण जास्त बोलणार नसल्याचे राज यांनी म्हटले आहे. या वेळी त्यांनी पदाधिकाऱ्यांना मात्र, प्रसार माध्यमांशी संवाद न साधण्याचे कडक निर्देश दिले आहेत.



या विषयी मिळालेल्या अधिक माहितीनुसार माध्यमांशी संवाद साधू नका, अशा सूचना महाराष्ट्र निर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. बोरिवली मध्ये मनसेच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा पार पडला. यावेळी त्यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना या महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. आगामी काळात कशा पद्धतीने निवडणुकीला सामोरे जायचे आहे? कोणत्या गोष्टी समोर येणार आहेत? याची सर्व माहिती दिली जाईल. यासाठीच हा मेळावा असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

प्रसारमाध्यमांशी कोणीही संवाद साधायचा नाही. प्रसार माध्यमांशी संवाद साधने हे सर्वांसाठीच बंद केले असल्याचे राज ठाकरे यांनी या वेळी सांगितले. प्रसार माध्यमाचे प्रतिनिधी कोणाकडेही जाऊन तुला काय वाटते? असे विचारतात. मात्र ते ऐकून मला काय वाटते? हे जास्त महत्त्वाचे असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्रात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होणार आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व पक्ष सक्रिय झाले आहेत. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात समीकरणे तयार केली जात आहेत.

## महादेव मुंडे हत्या प्रकरणात
# ४ आरोपींना अटक

■ **महासागर प्रतिनिधी, बीड, दि. १ :**
जिल्ह्यातील बहुचर्चित महादेव मुंडे हत्या प्रकरणात अखेर 4 आरोपींना अटक करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी एका पोस्टद्वारे ही माहिती दिली आहे. महादेव मुंडे यांच्या पत्नीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ही कारवाई झाल्यामुळे या प्रकरणी आता मोठ्या घडामोडी घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

परळी येथील व्यापारी तथा पिग्मी एजंट महादेव मुंडे यांची 21 ऑक्टोबर 2023 रोजी निर्घृण हत्या करण्यात आली होती. त्यांचा मृतदेह परळी तहसील कार्यालयासमोरील मैदानात आढळला होता. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पण अद्याप एकाही आरोपीला अटक करण्यात आली नव्हती. अखेर महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी गुरूवारी या प्रकरणी मुख्यमंत्री महादेव मुंडे यांची भेट घेतली. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाच्या एसआयटी चौकशीचे आदेश दिले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे शुक्रवारी या प्रकरणी 4 आरोपींना अटक करण्यात आली. या प्रकरणी आरोपींची नावे कळली नाहीत. पण ही एक मोठी कारवाई असल्याचे मानले जात आहे.

आमदार रोहित पवार यांनी एका ट्विटद्वारे या अटकसत्राची माहिती दिली. ते या प्रकरणी म्हणाले की, महादेव मुंडे हत्या प्रकरणात चार आरोपीना आज सकाळी अटक करण्यात आली असून दोन वर्षे उशिराने का होईना अखेर पोलिस तपासाला आज मुहूर्त मिळाला असेच म्हणावे लागेल. मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्यानंतर पोलिसांनी कारवाईला सुरवात केली यावरून राजकीय दबावामुळे पोलीस यंत्रणांचे हात बांधले गेले होते का ? असे प्रश्न आज निर्माण होतात. असे असेल तर राज्यातली बिघडलेली कायदा सुव्यवस्था बघता लांबच लांब रांगा लागतील.

# मंत्रिमंडळात कितीही पत्ते पिसले तरी डाग पुसले जाणार नाहीत
## कलंकित मंत्र्यांना जावेच लागणार; खासदार संजय राऊत यांचा दावा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :**
सरकार मंत्र्यांना वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. सरकार तसा प्रयत्न करत राहील. मात्र, सरकारने कितीही रंगसफेदी करण्याचा प्रयत्न केला तरी सरकारची कलंकित झाले आहे. महाराष्ट्राला डाग लागला आहे. तो अशा प्रकारच्या मंत्रिमंडळातील पत्ते पिसल्यामुळे तो डाग पुसला जाणार नाही. त्यामुळे मंत्र्यांना जावेच लागेल, असे मी खात्रीने सांगत असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे.



राज्यातील सहा ते सात मंत्र्यांना राजीनामे द्यावे लागतील, असा दावा राऊत यांनी केला होता. मात्र, मंत्री मंडळामध्ये केवळ दोन मंत्र्यांचे खाते बदल करण्यात आले आहेत. यावरुन राऊत यांनी देवेंद्र फडणवीस सरकारवर टीका केली आहे. राज्यातील कलंकित मंत्र्यांना जावेच लागणार असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे.

या विषयी राऊत म्हणाले की, वसईच्या आयुक्तांवर पडलेली धाड हे 1000 कोटींचे प्रकरण आहे. त्यात देखील एका मंत्र्याला जावे लागेल. तसेच आता जे नवीन क्रीडा मंत्री आहेत. वास्तविक त्यांना आता योग्य खाते मिळाले आहे. ही देखील तात्पुरती व्यवस्था आहे. प्रत्येक आरोपी शेवटपर्यंत स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न करत असतो. देवेंद्र फडणवीस यांनी अमित शहा यांच्या भेटीमध्ये काय सांगितले? हे मला माहिती असल्याचा दावा राऊत यांनी केला आहे. कोकाटे यांच्यावर झालेली कारवाई ही थातूरमातूर आहे. वास्तविक आरोपी मंत्री आणि त्यांचे नेते आपापल्या माणसांना वाचवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. याचा जनतेच्या आणि विरोधी पक्षाच्या मतावरती काहीही परिणाम होणार नाही. देवेंद्र फडणवीस यांना देखील हेच करायचे आहे. दिल्लीत अमित शहा यांच्या भेटीमध्ये मुख्यमंत्र्यांनी त्यांना देखील तसे सांगितले आहे. अशा लोकांबरोबर मला काम करणे अवघड झाले असल्याचे फडणवीस यांनी शहांना सांगितले आहे. त्यामुळे याबाबत निर्णय घ्यावा लागेल, असे त्यांनी शहा यांना सांगितले आहे. सरकार आणि राज्याची यामुळे बदनामी होत असल्याचे फडणवीस शहांना म्हणाले असल्याचा दावा राऊत यांनी केला आहे.

# भानखेडा शिवारात महसूल पथकावर वाळू माफियांचा हल्ला

■ **महासागर प्रतिनिधी, हिंगोली, दि. १ :**
सेनगाव तालुक्यातील भानखेडा शिवारात उपविभागीय अधिकाऱ्यांच्या पथकाने टिप्पर पकडल्यानंतर वाळू माफियांनी ग्राम महसूल अधिकाऱ्यास मारहाण करून टिप्पर पळविल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी सहा जणांवर शुक्रवारी ता. 1 पहाटे सेनगाव पोलिस ठाण्यात सरकारी कामात अडथळा आणल्या प्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सेनगाव ते येलदरी मार्गावर एका टिप्पर मधून वाळू वाहतूक केली जात असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांना मिळाली होती. त्यावरून घुटुकडे यांनी तीन ग्राम महसूल अधिकारी यांना सोबत घेऊन गुरुवारी ता. 31 मध्यरात्री भानखेडा शिवार गाठले. या ठिकाणी पथकाने भानखेडा शिवाराजवळच वाळू वाहतूक करणारे टिप्पर पकडले. त्यानंतर पथकाने चालकास टिप्पर पोलिस ठाण्यात घेऊन चला अशा सूचना दिल्या. त्यानंतर ग्राम महसूल अधिकारी अजय चोरमारे यांना टिप्पर मध्ये बसविले.

दरम्यान, उपविभागीय अधिकारी घुटुकडे यांचे वाहन पुढे अन टिप्पर मागे धावत होते. यावेळी अचानक एका पांढ्या रंगाच्या कारमधून (क्र.एमएच-26बीसी 9566) दोन इसम व काळ्या रंगाच्या स्कॉर्पिओ मधून (एमएच-38-एडी8059) नवनाथ राठोड व इतर खाली उतरले. त्यांनी टिप्पर थांबवून त्यात बसलेले ग्राम महसूल अधिकारी चोरमारे यांना खाली खेचून दगडाने मारहाण केली या शिवाय अश्लिल शिवीगाळ केली. त्यानंतर सहा जणांनी वाळूने भरलेले टिप्पर घेऊन पळ काढला. या प्रकरणी ग्राम महसूल अधिकारी चोरमारे यांच्या तक्रारीवरून सेनगाव पोलिसांनी शुभम खिल्लारे (रा. ब्रम्हवाडी), नवनाथ राठोड (रा. बोडखा) व इतर चौघांवर शासकिय कामात अडथळा केल्या प्रकरणी गुन्हा दाखल केला .

# गणेशोत्सवावरील कालमर्यादेची बंधने शिथिल व्हावी: उपमुख्यमंत्री अजित पवार

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १ :**
सण उत्सव साजरे करत असताना ध्वनिक्षेपक किंवा इतर अनुषंगाने न्यायालयाने कालमर्यादेबाबत बंधने घातलेली असून त्यातील काही दिवस ठरावीक मर्यादेची शिथिलता देण्यात येते. त्यापैकी अधिकाधिक दिवस गणेशोत्सवासाठी देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, तसेच गणेशोत्सव साजरा करत असताना कालमर्यादेची बंधने शिथिल व्हावीत यासाठी न्यायालयामध्ये बाजू मांडण्याचे काम करू, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.



श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्यावतीने आयोजित पिंपरी चिंचवड राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धा २०२४ बक्षीस वितरण समारंभात ते बोलत होते. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात आयोजित या कार्यक्रमास आमदार हेमंत रासने, शंकर जगताप, श्रीमंती दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, उपाध्यक्ष माणिक चव्हाण, पिंपरी चिंचवड राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धेचे आयोजक विलास कामठे, बापूसाहेब धमाले, कैलास भांबुर्डेकर आदी याप्रसंगी उपस्थित होते.

गणेशोत्सव सर्वांना एकत्र करणार आहे, असे सांगून उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, लोकमान्य टिळक यांनी सुरू केलेला हा गणेशोत्सव जगातील पावणेदोनशे देशात साजरा केला जातो. जगामध्ये गेलेले भारतीय गणेशोत्सव साजरे करत असतात. नवी पिढीदेखील या उत्सवात मनापासून काम करत असते. आपली भारतीय संस्कृती, परंपरा, सण हे सर्वांना बरोबर घेऊन जाणारे आहेत. सर्वांमध्ये आपलेपणा, एकोपा निर्माण करणारे आहेत. त्यातून अनेकांना सामाजिक क्षेत्रात संधी मिळत असते, असे उपमुख्यमंत्री म्हणाले.

अजित पवार पुढे म्हणाले, गणेश मंडळे वर्षाचे ३६५ दिवस काम करत असतात. सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक जागृतीचा सुंदर सेतू निर्माण करण्याचे काम करतात, ही अभिमानाची बाब आहे. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट हे समाजसेवेचे शक्तीकेंद्र ठरले आहे. गणेशोत्सवात कोणीही मागे राहू नये यासाठी सर्वांनी सहभाग घ्यावा.

गणेशोत्सव हा राज्य उत्सव व्हावा यासाठी आमदार रासने यांनी विधानसभेत भूमिका मांडली. आणि मुख्यमंत्री तसेच आपल्यासह दोन्ही उपमुख्यमंत्री, सांस्कृतिक कार्यमंत्री आणि सर्व सभागृहाने पाठिंबा दिला, ही आपल्यासाठी आनंदाची बाब आहे, अशा शब्दात त्यांनी भावना व्यक्त केल्या.

आपली भूमी साधू, संतांची, वारकऱ्यांची असून कोणतेही गालबोट न लागता उत्सवा साजरा केला जावा. हे करत असताना सामाजिक भान देखील ठेवले पाहिजे. निसगार्ची काळजी घेतली पाहिजे. आगामी गणेशोत्सव सामाजिक सलोखा राखून, पर्यावरण पूरक साजरा करावा. पर्यावरण संरक्षणासाठी गणेश विसर्जन कृत्रिम हौदात केले जावे, अशी भूमिकादेखील त्यांनी मांडली.

राज्य शासन पुणे, पिंपरी चिंचवडसह राज्यातील शहरे आणि राज्याच्या विकासासाठी अनेक प्रकल्प राबवत आहे. पुणे, पिंपरी चिंचवडमधील वाहतूक कोंडी सुटावी यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचा आणि पीएमआरडीएचा रिंग रोड, मेट्रोची कामे करण्यात येत आहेत. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बळकट करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. अनेक ठिकाणी रस्त्यांचे रुंदीकरण करणे गरजेचे आहे. विकास कामे करत असताना जमिनीची आवश्यकता लागते.

## क्रीडा,कला कार्यानुभव निदेशक जिल्हा अध्यक्षपदी संतोष कुंदोजवार यांची निवड



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. १ ऑगस्ट :** चंद्रपूर जिल्हा क्रीडा,कला,कार्यानुभव निदेशक संघटनेच्या जिल्हाध्यक्ष पदी संतोष कुंदोजवार यांची तर सचिव म्हणून अमोल आवारी याची निवड करण्यात आली आहे. जिल्हा क्रीडा,कला,कार्यानुभव निदेशकाची चंद्रपूर येथे विशेष बैठक घेण्यात आली. त्यात अध्यक्ष संतोष कुंदोजवार,सचिव अमोल आवारी,उपाध्यक्ष शालू काळे,सह सचिव विशाखा गुजर,कार्याध्यक्ष नितीन चौथाले,कोषाध्यक्ष रवींद्र तेलसे, तर सदस्य म्हणून रुपेश वनकर,गणेश आकेवार,अंजली धर्मपुरीवार, राजश्री चहारे,उर्मिला बंदुकवार,संजीवनी बावणे,अश्विनी तेलंग,अनिल झाडे,सुधीर पेंदराम याची निवड केली.

## जिल्हास्तरीय लिटील राधाकृष्ण स्पर्धा

**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. ०१ ऑगस्ट:** श्री कृष्ण जन्माष्टमी निमित्त चिमूर शहरात जिल्हास्तरीय लिटिल राधाकृष्ण स्पर्धा २०२५ चे आयोजन ३ अगस्त ला करण्यात आले असून ५ ते १५ वर्षाखालील बालकांसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. चिमूर विधानसभा क्षेत्राचे आमदार कीर्तीकुमार भांगडीया यांचे विशेष सहकार्याने टीम राधा कृष्णच्या नेतृत्वात श्री कृष्ण जन्माष्टमी निमित्य जिल्हा स्तरीय लिटिल राधाकृष्ण स्पर्धा २०२५ चे आयोजन अभ्यंकर मैदान चिमूर येथे दिनांक ३ ऑगस्ट ला दुपारी २ वाजता करण्यात आले आहे.

# वर्धा नदीच्या बेलोरा पुलावरून ट्रक कोसळला,चालकाचा मृत्यू

### चालकाला हदयविकाराचा झटका आल्याने ट्रक नदित कोसळला

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि. १ ऑगस्ट** : दि.१ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजी सकाळी ९:२० वाजता वणी जाणाऱ्या मार्गावर असलेल्या वर्धा नदीच्या बेलोरा पुलावरून ट्रक खाली कोसळल्याची दरम्यान घडली.

माहितीनुसार १८ चक्का हायवा क्रमांक MH34/BZ1402 चड्डा कंपनीचा ट्रक हा वेकोलीच्या नायगाव खदानित कोळसा भरण्यासाठी जात असताना अचानक ट्रक चालकाला हृदयविकाराचा झटका आला व ट्रक अनियंत्रित होऊन पुलाची रेलिंग तोडून वर्धा नदीच्या काठावर पडला



यामुळे ट्रक चालक केबिनमध्ये अडकून गंभीर जखमी झाला.

ट्रक चालकाचे नावं यादव असे असून तो शास्त्रीनगर घुग्घूस येथील रहिवाशी असल्याचे सांगितले जाते.

या घटनेची माहिति या मार्गावरून जाणाऱ्या येणाऱ्याना होताच नागरिकांनी घटनास्थळी मोठ्या संख्येने गर्दी केली व तात्काळ या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली असता पोलीस व बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले आणि गॅस कटरच्या मदतीने ट्रकचे केबिन कापून ट्रक चालकाला बाहेर काढले व जखमी अवस्थेत राजीव रतन रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित करण्यात केले.पुढील तपास पोलीस करीत आहे.

# भाजपा भिसीच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



**महसागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. १ ऑगस्ट :** भारतीय जनता पार्टी भिसी च्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पन करून शुक्रवार ला अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी भाजपा चे जेष्ठ नेते घनश्याम डुकरे, किशोर मुंगले ,निलेश गभने , पंकज गाडीवार, शेखर रेवतकर , कृष्णा तेजने सर, किशोर नेरलवार, लीलाधर बंन्सोड, अजय शेरकी रामु जाजू , धोंडू खवसे ,अतुल पारवे, राजु सातपुते , राजु बानकर, रवि लोहकरे, सागर श्रीरामे , विनोद खवसे , लक्ष्मण नैताम, दीपक नौकरकर, संजय पायघन बालू बावणे, अजय पायघन,विलास दिघोरे, मनोज लोहकरे, मनोज अहेर , विनोद वरघने , सुधाकर मेंघरे तसेच भारतीय जनता पार्टी चे जेष्ठ नेते, पदाधिकारी, सदस्य, शक्तीकेंद्र प्रमुख, बुथ अध्यक्ष , असंख्य कार्यकर्ते व समाज बांधव उपस्थित होते.

# शेतीच्या वादातून महादवाडी येथील अमोल भागडे यांच्या कुटुंबीयाना जबर मारहाण

### पोलीसांच्या समोरच मारहाण, भागडे यांची पत्रकार परीषदेत माहिती

**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. १ ऑगस्ट :** चिमूर तालुक्यातील शेवटच्या टोकावर असलेल्या महादवाडी येथे २८ जुलैला रोज सकाळी ६.३० वाजता अमोल भागडे हे आपल्या शेतीवर धानाच्या शेतीला खत देण्याकरीता व पाणी पाहण्यासाठी गेले.शेतीवर धुऱ्यांनी फीरत असताना उत्तम भागडे व रघुनाथ भागडे यांच्या शेतामधून एकत्र धुऱ्यावर प्लास्टीकचे पाईप टाकुन शेतात पाणी येत असल्याचे दिसून आले .

घरी परत आल्यावर ११ वाजता अमोल भागडे हे खाजगी कामासाठी चंद्रपूरला गेले.चंद्रपूर वरून परत आल्यानंतर उत्तम भागडे याना प्लास्टीक पाईप धुऱ्यावर ठेवून पाणी सोडत असल्याची विचारणा केली .पण तो काही न ऐकता तुला जे करायच आहे ते कर अशी धमकी वजा भाषा वापरली .अमोल



भागडे यांनी आपल्या भावाला बोलवले .

दुसऱ्या दिवशी पोलीसांच्या समोरच अमोल भागडे यांच्या कुटबीयांना जबर मारहाण केली .लहान भावाला डोळ्याला ईजा पोहचली व अमोल भागडे व आईला सुध्दा जखमा आहेत .

शेती वादाची तक्रार तहसीलदार चिमूर यांना देण्यात आली . आरोपीवर कठोर कार्यवाही करून अटक करण्यात यावी अशी मागणी अमोल भागडे व कुटुबीयानी पत्रकार परीषदेत केली आहे .

जर न्याय न मीळाल्यास पोलीस स्टेशन चिमूर समोर आत्मदहनाचा इशारा अमोल भागडे , आई - वडील , भाऊ यांनी दिला आहे .

आता पोलीस वीभाग सर्व प्रकरणाची चौकशी करून मारहाण करणाऱ्या व्यक्तीवर काय कार्यवाही करतात याकडे लक्ष लागलेले आहे.

# सुनिता देशकर यांच्या घरी फुलले ब्रह्मकमळ

### वर्षातून एकदाच फुलते दुर्मीळ पवित्र ब्रम्हकमळ फुल



**महसागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. १ ऑगस्ट :** ब्रह्मकमळ ही एक दुर्मिळ वनस्पती असून ती हिमालयावर १३ ते १७ हजार फुटांवर पहावयास मिळते. ब्रह्मकमळाचे शास्त्रीय नाव सॉसुरिया ऑबव्हलाटा हे आहे.

भारतात डचमन्स पाईप कॅक्टस या निवडुंग प्रजातीत येते. हे एक दुर्मिळ आणि पवित्र फुल मानले जाते. ते वर्षातून फक्त एकदाच फुलते, सहसा रात्री आणि ते फक्त एक रात्र टिकते वटवाघुळ आणि पतंग यांसारख्या परागकणांना आकर्षित करण्यासाठी हे फुल तीव्र सुगंध निर्माण करते. राजुरा येथील गडी वार्ड ,महादेव मंदिराच्या जवळ असणारे नरेंद्र किसनराव देशकर यांची पत्नी सुनिता आणि मुलगी प्रियल यांनाही झाडांचा खुप छंद आहे. त्यांच्या घरी विवीध प्रजातीचे फुल, फळ, शो चे झाडं मोठ्याप्रमाणात आहेत. त्यातच दिनांक ३१ जुलैला रात्रौ फुललेल्या ब्रह्मकमळने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे.

हे फुल वर्षातून एकदाच फुलते व एकच रात्र टिकते हे विषेश. या वनस्पतींची पाने आणि फुले औषधी कारणासाठी वापरली जातात. हे एक निशाचर फुलांचे रोप आहे. आयुर्वेदिक औषधात ब्रह्मकमळाचा मोठा उपयोग आहे. ही वनस्पती त्याच्या औषधी गुणधर्मांसह ताप फ्लू आणि इतर आजारांवर उपचार करते. त्वचेचे विकार बरे होण्यापासून ते आतड्यासंबंधीच्या आजारापर्यंत हे काम करते. नरेंद्र देशकर हे वनविभागात कामं करतात. त्यामुळें वृक्ष, वन, वनस्पती, पशू पक्षी प्राणी याविषयी आत्मीयता आहे. घरातील सर्वच व्यक्ती वृक्ष संवर्धनासाठी सातत्याने कार्य करीत आहेत. नैसर्गिक पर्यावरण संवर्धन व मानवता विकास संस्थेचे देशकर हे चंद्रपूर जिल्हा उपाध्यक्ष सुद्धा आहेत.

> माझे पती वनविभागात कार्यरत आहेत. त्यामुळें स्वाभाविकच कुटुंबीयांना पण वृक्ष लागवड, पशू पक्षी प्राणी, बाग, बगीचे याविषयी आम्हाला पण आवड निर्माण झाली. आम्ही सर्वांनी काल अतीशय दुर्मिळ ब्रम्हकमळ फुल उगवतानाचां अविस्मरणीय क्षण अनुभवला. अनेक पालेभाज्या,फळ, फूल, औषधी वनस्पती आमच्या घरी आहेत. परंतु वर्षातून फक्त एकदाच एकाच रात्री टिकणारे ब्रह्मकमळ फुल बघून आम्ही खूपच आनंदी आहोत. जणूकाही पर्यावरण संवर्धनाची निसर्गाने दिलेली ही एक अनमोल भेटच आहे.
>
> **सुनिता नरेंद्र देशकर, गृहिणी**

# बल्लारपूर शहरात स्मार्ट मीटर लावण्याचे कार्य तात्काल बंद करावे : शहर कॉंग्रेस कमेटी

**महासागर प्रतिनिधी**

**बल्लारपूर, दि. १ ऑगस्ट** : शहर कांग्रेस कमेटी तर्फे बल्लारपूर शहरात स्मार्ट मीटर बसवले जात आहेत, ते तात्काळ थांबवण्याचे निवेदन दि.०१ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता अरविंद काटकर यांना देण्यात आला.

निवदेनात म्हटले आहे की, बल्लारपूर शहरात मागील काही दिवसांपासून जूने विज मिटर काढून नवीन स्मार्ट मिटर लावण्याचे काम आपल्या विभागातर्फे सुरु करण्यात आलेले आहे. परंतू ज्यांच्या घरी हे स्मार्ट मिटर लावण्यात आलेले आहे. त्यांच्या



तक्रारीनुसार स्मार्ट मिटर लावल्या नंतर त्यांचे विज बिल दुप्पट झालेली आहे. काही तक्रारीनुसार मिटर लावणारी एजेंसी कडुन विज ग्राहकांवर दडपण आणून स्मार्ट मिटर लावन्यात येत आहे. बल्लारपुर शहरात स्मार्ट विज मिटर लावण्याचे काम तत्काल थांबवावे.

तसेच ज्या विज ग्राहकांच्या घरी , दुकानात नवीन स्मार्ट मीटर लावन्यात आलेले आहे त्याना काढुन जूने विज मीटर लावन्यात यावे. निवेदन देताना महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे सचिव घनश्याम मूलचंदानी, शहराध्यक्ष देवेंद्र आर्य, माजी शहराध्यक्ष अब्दुल करीम शेख, भास्कर माकोडे, डॉ. सुनील कुलदीवार, नरेश मूंधड़ा, सुनंदा आत्राम, नरसिंग रेब्बावार, प्रणेश अमराज, मेहमूद पठाण, कासिम शेख, मंगेश बावणे, नरेश आनंद, नरेश बुरांडे यांच्यासह कॉंग्रेस, महिला कॉंग्रेस, युवक कॉंग्रेस, एनएसयूएआय, इंटकचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## ॲड. मोरेश्वर टेमुर्डे यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य तपासणी शिबिर

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. १ ऑगस्ट :** विधानसभेचे माजी उपसभापती आणि विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट) वरोरा यांचे माजी अध्यक्ष दिवंगत ॲड. मोरेश्वरराव टेमुर्डे यांच्या ८३ व्या जयंतीनिमित्त ४ ऑगस्टला श्री मंगल कार्यालय भद्रावती येथे एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. आणि त्यांच्या चरित्राचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते केले जाईल. तसेच विवेकानंद महाविद्यालय भद्रावतीचे वार्षिक मासिक 'विवेक' प्रकाशित केले जाईल आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान केला जाईल.याशिवाय, शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, नागपूर यांच्या सौजन्याने भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे.

# स्वरप्रज्ञा संगीत विद्यालयाने वाहिली मोहम्मद रफी यांना श्रद्धांजली



**महासागर प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. १ ऑगस्ट :** ब्रम्हपुरी येथे ३१ जुलै २०२५ रोजी महान गायक मोहम्मद रफी साहेबांच्या पुण्यस्मरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्या निमित्याने रफी साहेबांची निवडक गिते सादर करण्यात आली.

या संगीत कार्यक्रमात स्वरबहार सुरेश बनकर, संजय बनकर यांनी रफी साहेबांची सदाबहार गीते गायन करून उपस्थिताना मंत्रमुग्ध केले. उत्कृष्ट हार्मोनियम वादक लखन कुंभारे, तबला संगत रवी ठेंगरी, ढोलक संगत राकेश पिल्लेवान यांनी उत्तम साथसंगत केली.या कार्यक्रमाला शशिकांत बांबोळे , हेमंत खोब्रागडे , मधुकर खरकाटे यांनी उपस्थित राहून संगीत मैफलीचा आनंद लुटला.स्वरप्रज्ञा संगीत विद्यालयाचे मार्गदर्शक राकेश पिल्लेवान यांनी सर्वांचे आभार मानले.

# घुग्घुस शहरातील कासव गतीने पुलाचे बांधकाम सुरु असल्याने व वाहतूक पोलीस नसल्याने जोरदार अपघात !

### लक्ष केंद्रित केव्हा झाले अपघात झाल्यावर न ट्राफिक सिंग्नल चालु का बर ?

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस, दि. १ ऑगस्ट :** घुग्घुस येथील वणी रोडवरचे पुलाचे बांधकाम कासव गतीने चालु आहे,वेळोवेळी राजकीय पक्षाचे नेते निवेदन देत असतात व थातूरमातूर आंदोलन करण्यात येते,काही स्वताला सामाजिक कार्यकर्ता म्हणून फेसबुक लाईव विडिओ बनवितात तर काही सामाजिक नेते मंत्र्याला निवेदन देत असतात काम झाल सर्वच मीच केले म्हणतात. वर्षानुवर्ष कासव गतीने पुलाचे काम चालु आहे. आणि अनेकदा नेते थातूरमातूर आंदोलन करण्यात येतात, पण काहीच होत नाही, अनेक अपघात होत राहतात.

दि.३० जुलै बुधवार रोजी रात्री अंदाजे ०९:२० वाजता ट्रक क्रमांक टी.जी.२९ टी.२९६९ छत्रपती शिवाजी चौक परिसरात जोरदार दुचाकी वाहनला जोरदार धडक दिली.दुचाकी वाहनावर दोन वेकोलिचे कर्मचारी होते.धडक एवडी जोरदार होती की,दोघाचे पायाचे चेंदामेंदा झाला. ते वेकोली कैलाश नगर कॉलनीचे रहिवासी होते. सूत्रानुसार अनेकदा वाहतूक पोलीसांची नियुक्ती करण्याची निवेदन देण्यात आले.

तरीपण अनेकदा छोटे,मोठे अपघात होत असतात.आणि थातूरमातूर काही दिवस वाहतूक पोलीस असते. छत्रपती शिवाजी महाराज चौकात सिंग्नल असल्यामुळे बरेच महिन्यापासून सिंग्नल नियमितपणे सुरू नसुन तेथुनत दिवसातुन १० ते १२ वेळा वाहतूक पोलीस गाडीने चकरा मारत राहतात,पुलाचे कासव गतीने काम चालु आहे न अंदाजे वीस वेळा रेल्वे गेट बंद करण्यात येतात, आणि जडवाहतूक व छोटे,मोठे वाहतूकीने रस्ता जाम होतात.तसेच नागरिकांना खुपच त्रास सहन करावा लागतो.

राजकीय,अनेक पक्ष नेते थातूरमातूर आंदोलन करतात व निवेदन देत असतात.सत्ताधारी व बिनसत्ताधारी दोघेही थातूरमातूर कामे करीत नागरिकात चांगली, वारंवार चर्चा करण्यात येत आहे.

# आ. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त राजुरा येथे महाआरोग्य शिबिर

### ४३६४ नागरीकांना लाभ; तर ५०३ रुग्ण विविध शस्त्रक्रियेस पात्र

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. १ ऑगस्ट** :- समाजीक उत्तर दायित्व म्हणुन काम करणारे माजी मंत्री, आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्य महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय राजुरा येथे आरोग्य शिबीराचे आयोजन करून ४३६४ लोकांना आरोग्य तपासनी व औषध उपचाराचा लाभ देण्यात आला.

जिल्ह्यात कुठेही आरोग्याची समस्या भासली तर लोकांच्या ओठी आशेने सुधीरभाऊंचे नाव येते. त्यामुळे सेवा असा समानार्थी शब्दच आता जिल्ह्यात रूढ झाला आहे. त्यासाठी त्यांच्या सेवाभावी व्यक्तिमत्त्वाला साजेसा उपक्रम राबवून ३० जुलै हा त्यांचा वाढदिवस महाआरोग्य शिबीरासारख्या आरोग्यसेवेच्या माध्यमातून साजरा करण्यासाठी आम्ही संकल्पबद्ध आहोत. अशी भावना आयोजक तथा आमदार देवराव भोंगळे यांनी आपल्या उद्घाटनीय मनोगतातून व्यक्त केली.

या महाआरोग्य शिबीरात नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट नागपूरचे डॉ. पवन अरगडे व त्यांच्या चमूने संशयीत शिबिरार्थींच्या कॅन्सर तपासण्या केल्या.

तर व्हिएसपीएम दंत महाविद्यालयाच्या चमूने



शिबीरार्थींच्या दंत चाचण्या व दंत आरोग्यासंबंधी सेवा पुरविली. आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी (मेघे), भारतीय जनता पार्टी राजुरा शहर व ग्रामीण, ग्रामीण रुग्णालय राजुरा, तालुका आरोग्य अधिकारी व चमू यांच्या सहकार्याने पार पडले असून या महाआरोग्य शिबीराचा ४३६४ नागरीकांनी लाभ घेतला असून त्यापैकी ५०३ रुग्ण हे विविध आजारांवरील शस्त्रक्रियेस पात्र ठरले आहेत. या सर्व शिबीरार्थींवर ५ ऑगस्टपासून मोफत शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. अशी माहीती ही आयोजक म्हणून त्यांनी यावेळी दिली.

पुढे बोलताना, आरोग्य सेवेसारखे दुसरे पुण्य नाही. आजच्या धावपळीच्या जीवनात ग्रामीण भागातील गोरगरिब बांधव आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात; अनेकदा पैशाअभावी अतीगंभीर आजार अंगावर काढतात त्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने भविष्यात अनेक समस्या उद्भवू शकतात. अशावेळी गोरगरिब बांधवांना पायाच्या नखापासून तर डोक्याच्या केसापर्यंत भेडसावणाऱ्या समस्यांचे एकाच छताखाली निदान, उपचार व मोफत शस्त्रक्रिया करून देण्यासाठी हे महाआरोग्य शिबीर आशेचे किरण ठरतात. दरवर्षीच या शिबिरांना मोठे जनसमर्थन ही मिळते. आदरणीय सुधीरभाऊंच्या वाढदिवशी नरसेवा हिच नारायणसेवा मानून जनता-जनार्दनाला आरोग्यसेवा देत खऱ्या सेवाभावाने सुधीरभाऊंच्या दिर्घायुष्याची कामना करणे आम्हाला आत्मीक समाधान देऊन जाते, असेही ते म्हणाले.

# भाजपकडून तेरा उमेदवार नगराध्यक्ष पदाकरिता इच्छुक असल्याची चर्चा

### पुरुष खुला किंवा ओबीसी आरक्षणकडे सर्वांचे लक्ष, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक २०२५

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. १ ऑगस्ट :** सध्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीचे वारे वाहताना दिसून येत आहे.आरक्षण घोषित होण्या आगोदर भाजपात नगराध्यक्ष पदाकारिता जवळपास १३ उमेदवार निवडणूक लढण्यास इच्छुक असल्याची चर्चा सध्या राजुरा शहरात ऐकायला मिळत आहे.

या इच्छुक उमदेवारामध्ये व्यापारी, भाजपचे जेष्ठ नेते, युवा कार्यकर्ते यांचा समावेश आहे. सध्या भाजपचे आमदार देवराव भोंगळे यांच्यावर विश्वास ठेऊन कॉंग्रेस आणि शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते भाजप मध्ये प्रवेश करताना दिसून येत आहे. मागील विधानसभा निवडणुकीत देवराव भोंगळे यांनी दिग्गज उमेदवारांना धक्कादायक पराभव केल्याने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेचा निवडणुकीत भाजपचे नेते आणि कार्यकर्त्यांना नगराध्यक्ष बनण्याची आशा पल्लवीत झाले आहे. तसेच सध्या राजुरा शहरात भाजपचे चांगले वातावरण दिसून येत आहे. तसेच आमदार कोणत्याही परिस्तिथीत नगराध्यक्ष भाजपचे विराजमान करणार त्यामुळे नगराध्यक्ष पदाकारिता निवडणूक लढण्यास इच्छुकांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे.

राजुरा शहरातील पान टपाऱ्यावर भाजप मध्ये नगराध्यक्ष पदाकरिता निवडणूक लढण्यास जवळपास १३ उमेदवार इच्छुक असल्याची चर्चा ऐकायला मिळत आहे. सध्या तेरा उमेदवार आरक्षण सोडत कडे लक्ष ठेऊन आहे. तसेच यावेळी अध्यक्ष पदाकरिता ओबीसी पुरुष किंवा खुला पुरुष येणारच या आशेने नेत्याकडे आपली फिल्डिंग सेट करीत असल्याची चर्चा आहे.मात्र सध्या भाजपाचे आमदार देवराव भोंगळे याच्या कडून सावध भूमिका घेतले असून आरक्षणा नन्तर आमदार आपले पत्ते उघडे करणार असल्याची चर्चा आहे.तर दुसरी कडे संजय धोटे आणि सुदर्शन निमकर आपल्या समर्थकाला उमेदवारी मिळावी म्हणून शेवट प्रर्यंत प्रयत्न करणार यात काही शंका नाही.

तर कॉंग्रेस कडून फक्त एकच दिग्गजाचे नाव समोर येत असून शेवटी त्याच नावावर शेवटी शिक्कामोर्तब होणार असल्याची राजकीय वर्तुळा चर्चा आहे.

तसेच शेतकरी संघटनेचे नेते वामनरावं चटप यांचा पक्ष आगामी नगरपालिका निवडणूक पूर्ण ताकदीने लढणार असल्याचे संकेत दिलेले आहे.

आजही शहरात शेतकरी संघटनेचे छातीला माती लावून वामनरावं चटप यांचा करिता जीवाचे रान करणारे कार्यकर्ते आहे.

एवढे मात्र खरे आहे कीं आगामी निवडणूक चुरशीची होणार अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे. मात्र सध्या पान टपऱ्यावर त्या तेरा इच्छुक उमेदवारांची चर्चा रंगतदार ठरत आहे यात काही शंका नाही.

# मालेगावचे गुन्हेगार कोण?

महाराष्ट्रातील मालेगाव येथे राहणा?या सय्यद निसार यांचा मुलगा अझहर नमाज अदा करण्यासाठी बाहेर गेला होता. संध्याकाळी परत येत असताना तो भिक्कू चौकात पोहोचला. स्फोट झाला तेव्हा अझहर एका दुचाकीवरून जात होता. १९ वर्षीय अझहर व्यतिरिक्त आणखी ५ जणांचा मृत्यू झाला. सय्यद त्या दिवशी त्यांच्या लहान मुलाच्या मृत्यूमुळे खूप रडले. त्या दिवशीची तारीख होती २९ सप्टेंबर २००८. १७ वर्षांनंतर, सय्यद निसार यांच्या डोळ्यात पुन्हा अश्रू आहेत. मालेगाव स्फोटावरील न्यायालयाचा निकाल ३१ जुलै २०२५ रोजी आला. एनआयएच्या विशेष न्यायालयाने स्फोटातील सर्व सात आरोपी साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर, निवृत्त लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित, निवृत्त मेजर रमेश उपाध्याय, अजय राहिरकर, सुधाकर द्विवेदी, सुधाकर चतुर्वेदी आणि समीर कुलकर्णी यांना ना निर्दोष सोडले. न्यायालयाने म्हटले की, अभियोक्ता पक्ष आरोपींविरुद्धचा खटला सिद्ध करू शकला नाही. त्यावर ८० वर्षांचे सय्यद निसार म्हणतात, 'न्यायालयाच्या निर्णयाने माझ्या मुलाच्या मृत्यूचे दुःख परत वर आणले आहे. हा निर्णय अन्यायकारक आहे, पूर्णपणे चुकीचा आहे.'
आता प्रश्न हा उरतो की, या बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व सातही आरोपी जर निर्दोष आहेत तर स्फोट घडवून आणला कुणी? मालेगाव स्फोटाचे गुन्हेगार कोण?



न्यायालयाच्या निर्णयानंतर सय्यद निसार थरथरत्या आवाजात आणि ओल्या डोळ्यांनी सांगतात, 'माझा मुलगा नमाज अदा करून मशिदीतून बाहेर पडला होता. तो उनाड नव्हता. तो नेहमी तिथे जायचा. त्या रस्त्यावरून जाताना एका बाइकजवळ पोहोचणे आणि त्याच क्षणी त्या बाइकमध्ये झालेला स्फोट, हे सर्व एका क्षणात घडले. ते म्हणतात, जर आम्हाला इथे न्याय मिळाला नाही तर आम्ही सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावू. आम्ही न्यायासाठी लढू.

सय्यद निसार पुढे म्हणतात, 'माझा मुलगा त्यावेळी फक्त १९ वर्षांचा होता. १७ वर्षे झाली. मी न्यायाची वाट पाहत राहिलो. आज न्यायालयाने आम्हाला हा दिवस दाखवला आहे. आम्ही गप्प बसणार नाही. सरकारला आवाहन करताना ते म्हणतात, आम्हाला फक्त एवढेच हवे आहे की खऱ्या गुन्हेगारांना पकडले जावे आणि त्यांना कठोर शिक्षा व्हावी. आम्ही न्यायासाठी प्रत्येक न्यायालयात जाण्यास तयार आहोत.

अशीच कहाणी १० वर्षांची फरहीन या मुलीची आहे . ती वडा पाव खरेदी करण्यासाठी बाहेर गेली होती, स्फोटात तिचा मृत्यू झाला. मालेगावचे लियाकत शेखदेखील सय्यद निसार यांच्यासारखेच दुःख सहन करत आहेत. लियाकत म्हणतात, 'न्यायासाठी आम्ही १७ वर्षे गमावली. आता हा निर्णय आला आहे. हे पूर्णपणे चुकीचे आहे. आम्हाला ते मान्य नाही.'

लियाकत त्यांच्या मुलीच्या मृत्यूबद्दल सांगतात, 'माझी मुलगी वडा पाव खरेदी करण्यासाठी घराबाहेर पडली होती. अचानक मोठा स्फोट झाला. मी घाबरून बाहेर पळत सुटलो, सगळीकडे अंधार आणि धूर होता. मी घरी परतलो. माझ्या पत्नीने सांगितले की फरहीन अजून परतलेली नाही. मी तिला सांत्वन दिले की ती परत येईल. थोड्याच वेळात कोणीतरी धावत आले आणि म्हणाले की जखमींमध्ये एक लहान मुलगी आहे.'

'हे ऐकताच, आम्ही ताबडतोब फरहान हॉस्पिटलमध्ये पोहोचलो. तिथे मला माझी मुलगी दिसली. तिची ओळख पटवण्यासाठी मला माझे ओळखपत्र मागितले गेले. मला धक्का बसला होता आणि काहीही पाहू किंवा ऐकू शकत नव्हतो. लियाकत शेख यांचा प्रश्न असा आहे की जर निर्दोष सुटलेले आरोपी दोषी नसतील तर सरकारने खरे गुन्हेगार कोण आहेत हे सांगावे.

लियाकत पुढे म्हणतात, 'सुरुवातीला एटीएसने तपास केला होता, त्यांचा निकाल चुकीचा होता. त्यानंतर हेमंत करकरे यांनी खऱ्या गुन्हेगारांना पुराव्यांसह पकडले. आज न्यायालय म्हणत आहे की ते दोषी नाहीत. जर ते निर्दोष असतील तर खरे गुन्हेगार कोण आहेत? त्यांना आमच्यासमोर आणा.

न्यायालयाच्या निकालावर संताप व्यक्त करणाऱ्यांमध्ये तिसरे उस्मान हे एक आहेत . गुरूवारी न्यायालयाचा निकाल येणार असल्याने ते सकाळपासून वारंवार त्यांच्या घड्याळाकडे पाहत होते. न्यायालयाने निकाल जाहीर करताच त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले.

उस्मान म्हणतात, 'मी या निर्णयावर अजिबात खुश नाही. अजून निर्णय झालेला नाही. आमचा प्रश्न हा आहे की दोषी कोण आहेत. मुद्दा गुन्हेगाराला शिक्षा मिळवून देण्याचा होता.'

या स्फोटात उस्मान खान यांचा पुतण्या मृत्युमुखी पडला. उस्मान यांची साक्षही या खटल्यात समाविष्ट करण्यात आली. ते म्हणतात, 'माझा पुतण्या ऑटो चालवायचा. तो रमजानचा पवित्र महिना होता. सणामुळे खरेदी चालू होती. माझ्या पुतण्याने चहा पिण्यासाठी ऑटो थांबवला होता. चहा प्यायला जाताच स्फोट झाला. त्यांच्या शरीराचा मागचा भाग पूर्णपणे उद्ध्वस्त झाला होता.

आम्ही त्यांना घाईघाईने आणले. प्रथम आम्ही फरहान हॉस्पिटलमध्ये पोहोचलो. त्यांनी आम्हाला त्याला नाशिकला घेऊन जाण्यास सांगितले. आम्ही त्यांना नाशिकला घेऊन गेलो. तिथून त्यांना मुंबईतील जेजे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. तिथेच त्याचा मृत्यू झाला.

उस्मान पुढे सांगतात, पोलीस व प्रशासनाने संपर्क केला, त्यांनी त्याचे कपडे वगैरे काढून घेतले. नंतर, जमियत उलेमा-ए-हिंदने खूप मदत केली. त्यांनीच आम्हाला साक्ष देण्यासाठी तयार केले. आमच्यापैकी सहा जणांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. आम्ही आमचे जबाब नोंदवले. न्यायालयाने आम्हाला मालेगावचे भाडे आणि इतर खर्चही दिला.

### आरोपींची निर्दोष सुटका

न्यायालयाने आपल्या निकालात म्हटले आहे की, आरोपींविरुद्धचा खटला सरकारी वकिलांना सिद्ध करता आला नाही. स्फोटात वापरलेल्या दुचाकीची मालकी सिद्ध झाली नाही. आरडीएक्स आणल्याचा किंवा ठेवल्याचा कोणताही पुरावा सापडला नाही. कट रचल्याच्या बैठकांचेही ठोस पुरावे मिळाले नाहीत.

न्यायालयाने कबूल केले की तपासात गंभीर त्रुटी होत्या. स्फोटस्थळाचा पंचनामा योग्यरित्या करण्यात आला नव्हता. वैद्यकीय प्रमाणपत्रात छेडछाड केल्याचे आढळून आले. अभिनव भारत ही दहशतवादी संघटना असल्याचे सिद्ध करण्यासाठी निवृत्त मेजर रमेश उपाध्याय यांच्याविरुद्ध पुरावा सापडला नाही.

या प्रकरणाचा तपास प्रथम महाराष्ट्र एटीएसने केला. हेमंत करकरे यांच्या नेतृत्वाखाली साध्वी प्रज्ञा आणि इतर आरोपींना अटक करण्यात आली. एटीएसने या स्फोटाला अभिनव भारत संघटनेचे षड्यंत्र म्हटले.

२०११ मध्ये तपास एनआयएकडे सोपवण्यात आला. एनआयएने एटीएसच्या तपासावर प्रश्न उपस्थित केले. मकोका कलम काढून टाकण्यात आले. असे म्हटले गेले की एटीएसने आरडीएक्स पेरले आणि साक्षीदारांवर दबाव आणला. यामुळे सरकारी वकिलांची कहाणी कमकुवत झाली.

### दोन तपास आणि फरक

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाचा तपास महाराष्ट्र एटीएस आणि नंतर एनआयएने केला होता. दोन्ही एजन्सींच्या तपासात मोठा फरक आहे. एटीएसने दावा केला होता की हा स्फोट अभिनव भारत संघटनेच्या सदस्यांनी आखला होता. यामध्ये साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर, लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित, रमेश उपाध्याय, सुधाकर द्विवेदी, सुधाकर चतुर्वेदी आणि अजय राहिरकर यांना मुख्य आरोपी बनवण्यात आले होते.

एटीएसने सांगितले की, स्फोटात प्रज्ञा यांची बाईक वापरली गेली होती. बाईकचा चेसिस आणि इंजिन नंबर मिटवण्यात आला होता. सुधाकर द्विवेदी यांच्या लॅपटॉपमधून कथित बैठकांचे रेकॉर्डिंगदेखील सापडले. एटीएसने आरोपींविरुद्ध मकोका, यूएपीए आणि आयपीसीअंतर्गत गुन्हा दाखल केला. एजन्सीने असा दावा केला की स्फोटाचा उद्देश मुस्लिमबहुल भागात जातीय तणाव पसरवणे होता.

तथापि, सुनावणीदरम्यान एटीएसच्या तपासावरही प्रश्न उपस्थित करण्यात आले. साक्षीदारांवर दबाव आणण्यात आला आणि पुरावे चुकीच्या पद्धतीने सादर करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला.

२०११ मध्ये एनआयएने तपास हाती घेतला. एजन्सीने साध्वी प्रज्ञा, शिवनारायण कलसांगरा, श्याम बावरलाल साहू आणि प्रवीण तक्कलकी यांच्यावरील आरोप मागे घेतले. लोकेश शर्मा आणि धन सिंग यांना आरोपी करण्यात आले, परंतु २००८ च्या स्फोटात त्यांची भूमिका सिद्ध झाली नाही.

एनआयएने म्हटले आहे की एटीएसने नोंदवलेले कबुलीजबाब मकोका हटवल्यानंतर कायदेशीररित्या अवैध ठरले. अनेक साक्षीदारांनी त्यांचे जबाब मागे घेतले किंवा त्यात विरोधाभास आढळला. काही साक्षीदारांचा आरोप आहे की एटीएसने त्यांना चुकीच्या पद्धतीने ताब्यात घेतले आणि छळ केला.

एनआयएने मकोका रद्द केला आणि फक्त यूएपीए आणि आयपीसी अंतर्गत खटला चालवला. ३१ जुलै २०२५ रोजी विशेष एनआयए न्यायालयाने सर्व सात आरोपींना निर्दोष सोडले. न्यायालयाने स्फोट झाल्याचे मान्य केले, परंतु साध्वी प्रज्ञा यांच्यासोबत जोडलेल्या बाईकवर बॉम्ब ठेवला होता हे सिद्ध होऊ शकले नाही. पुरोहितने आरडीएक्सची व्यवस्था केली की बॉम्ब बनवला हे देखील सिद्ध झाले नाही.

एटीएस आणि एनआयएने केलेल्या तपासात मोठा फरक होता. एटीएसने १२ हून अधिक लोकांना आरोपी केले. एनआयएने अनेक आरोपींना क्लीन चिट दिली आणि अखेर ७ जणांवर खटला चालवण्यात आला. एटीएसने साक्षीदारांचे जबाब, कबुलीजबाब आणि दुचाकी पुरावे मानले. एनआयएने त्यांना कमकुवत किंवा अवैध म्हटले. एटीएसने 'भगवा दहशतवाद' आणि 'अभिनव भारत' कटावर भर दिला. एनआयएने म्हटले की ते सिद्ध होऊ शकत नाही. प्रश्न आताही कायम आहे, मालेगाव बॉम्बस्फोटाचे गुन्हेगार कोण?

■ ■ ■

## तुमचं स्वप्न, तुमची मेहनत आणि तुमचंच नवोदय!

विद्यार्थ्यांनो, आपण थोर व्यक्तींचे विचार ऐकले असतील. त्यातील एक प्रसिद्ध विचार आहे, स्वप्न तीच खरी, जी तुम्हाला झोपेत सुद्धा शांत बसू देत नाहीत. या विचारातून आपण शिकतो की, स्वप्न पाहा आणि ती पूर्ण करण्यासाठी स्वतःला संपूर्णपणे झोकून द्या.

----------------

मित्रांनो, हाच संदर्भ घेऊन आज आपण एक महत्त्वाच्या विषयाकडे वळणार आहोत. नवोदय विद्यालय समितीने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीच्या निवड चाचणीसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू केली आहे. ही प्रक्रिया १३ ऑगस्ट पर्यंत चालणार आहे. वर्ग पाचवीत शिकत असलेले विद्यार्थी या परीक्षेसाठी पात्र असतात, अश्या अनेक विद्यार्थ्यांच्या मनात एक स्वप्न असतं ते म्हणजे पुढे जवाहर नवोदय विद्यालयात शिकायचं.

कारण देशातील ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांसाठी उच्च दर्जाचे शिक्षण देणारी संस्था म्हणजेच जवाहर नवोदय विद्यालय. इथे वर्ग ६ करिता किंवा थेट वर्ग ९ साठी प्रवेश मिळावा यासाठी दरवर्षी देशातील लाखो विद्यार्थी ही परीक्षा देतात. पण यश मिळतं केवळ त्या थोडक्या मुलांना जे मेहनत, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शन घेऊन विशेष तयारी करतात त्यांनाच.

आज आपण या परीक्षेसाठी करावयाच्या तयारी सोबतच आपल्याला यशासाठी आवश्यक असलेली मानसिक तयारी, स्वतःचा आत्मविश्वास, मिळत असलेली प्रेरणा व ईतर नवोदय प्रवेशाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या दिशेने हात घालणार आहोत.



प्रफुल्ल क. दाते
वर्धा. 8149913142

चला तर मग, नवोदय प्रवेशाचा एक प्रेरणादायी प्रवास सुरू करूया नवोदयच्या दिशेने. त्यासाठी आपल्याला नवोदय म्हणजे काय? हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. जवाहर नवोदय विद्यालय ही शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत चालणारी एक स्वायत्त संस्था आहे. ग्रामीण भागातील गुणवंत आणि होतकरू विद्यार्थ्यांना येथे मोफत शिक्षण, निवास, भोजन आणि संपूर्ण अभ्याससामग्री दिली जाते. ही केवळ शाळा नाही, तर ते एक संस्कार केंद्र आहे असे म्हटले तरी हरकत नाही.ईथे व्यक्तिमत्व घडतं, नेतृत्वाचे धडे दिले जातात, आणि जीवनाच्या प्रत्येक स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना तयार केलं जातं.

मग प्रश्न येतो तो की, मी नवोदयची परीक्षा का द्यावी? तर या प्रश्नाचे उत्तर म्हणून मोफत आणि दर्जेदार शिक्षण, जिल्ह्यातील हुशार विद्यार्थ्यांशी मैत्री, आधुनिक तंत्रज्ञान, संगणक, ग्रंथालय आणि उत्तम क्रीडा सुविधा, स्पर्धा परीक्षा, विज्ञान प्रदर्शनं आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचा अनुभव शिवाय अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन, लहानपणापासूनच शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी वातावरण अनुभवण्याची संधी.

म्हणून पाहिले स्वप्न बघा आणि ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी कृती करा! लक्षात ठेवा तुमचं यश हे केवळ तुमच्या परीस्थितीवर अवलंबून नसतं, तर तुमच्या मेहनतीवर, आत्मविश्वासावर आणि पद्धतशीर केलेल्या तयारीवर अवलंबून असतं.
ही तयारी करीत असताना आपण नवोदय परीक्षेची रचना लक्षात घेवू.
नवोदयची परीक्षा ३ प्रमुख भागांवर आधारित असते. एक मानसिक क्षमता चाचणी त्यात चित्रांवर आधारित प्रश्न, तर्कशक्ती, निरीक्षण, नमुने ओळखणे याचा अभ्यास करावा लागतो.

दुसरे गणित यात मूलभूत संकल्पना, घातांक, सरासरी, प्रमाण, वेळ या समवेत ईतरही धडे इथे अभ्यासासाठी असतात. दररोज १०-१५ उदाहरणं स्वतः सोडवून बघितले तर गणिताचा अभ्यासक्रम सुद्धा आपल्याला परीक्षेच्या वेळेआधीच पूर्ण करता येतो. परंतू ईथे अभ्यासात सातत्य आणि सराव महत्त्वाचा आहे.

तिसरे म्हणजे भाषा (मराठी किंवा इतर मातृभाषा) यात शब्दसंपत्ती, वाक्यरचना, वाचन व समज,व्याकरण ईत्यादी गोष्टींना समजून घेणे आणि अचूक उत्तर निवडणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांना हे सर्व सहजता शक्य झाले पाहिजेत म्हणून अभ्यासासाठी काही खास टिप्स आवश्यक असतात म्हणून काही टिप्स सुद्धा आपणास देत आहो. ते म्हणजे तुम्ही दैनंदिन अभ्यासक्रम तयार करा, सकाळी मानसिक क्षमता, दुपारी गणित, संध्याकाळी भाषा, रात्रीला उजळणी. यात तुम्ही तुमच्या पद्धतीने बदल करू शकता.

रविवारचा उपयोग मात्र सराव चाचणीसाठी करा. मागील वर्षांची प्रश्नपत्रिका सोडवा, वेळेचं व्यवस्थापन शिका. कारण वेळ म्हणजेच आयुष्य.शाळेतील शिक्षक, पालक यांची मदत घ्या.

मानसिक तयारीही तितकीच महत्त्वाची. म्हणून दररोज ५ मिनिटं ध्यान किंवा प्रार्थना करा. स्वतःला दररोज सांगा ड्ढ ञमी नवोदयसाठी पात्र आहेञ. तुमच्या चुका स्वीकारा आणि त्यातून शिका.मित्रांशी तुलना न करता स्वतःशी स्पर्धा करा. हे सर्व केलेत तर यश तुमचेच आहे.

यासाठी एका मुलीचे प्रेरणादायी उदाहरण बघू. लहान गावात राहणारी एक मुलगी. अभ्यासात सुद्धा सामान्य. तिचे वडील घरी लक्ष देत नव्हते, आणि आई घरकाम करून घर चालवत होती.

तिने दिवसाला ४-५ तास अभ्यास केला. सुरुवातीला ती दोन सराव परीक्षांमध्ये अपयशी ठरली, पण ती खचली नाही. तिने प्रयत्न सुरूच ठेवले. आणि तिसऱ्या सरावात तिने ९८% गुण मिळवले. हे सातत्य तिने पुढेही कायम ठेवले आणि आज ती नवोदय विद्यालयात शिकत आहे. तिथे ती उत्कृष्ट कामगिरी करते आहे.

पालकांनी सुद्धा या सर्व प्रक्रियेत काही महत्वपूर्ण गोष्टीला लक्षात घ्यावे लागेल त्यात एक म्हणजे मुलांवर विश्वास ठेवा, त्यांना घरात अभ्यासासाठी शांत वातावरण द्या.शिक्षकांचे मार्गदर्शन घ्या आणि अपयश आल्यास परिस्थितीला दोष न देता त्यांना प्रोत्साहन द्या.
विद्यार्थ्यांसाठी सर्वात महत्त्वाचं स्वतःवर विश्वास ठेवा! तुम्ही गरीब असाल तरी चालेल, पण मेहनती असाल तर तुम्हाला कोणी थांबवू शकत नाही. नवोदय ही फक्त एक परीक्षा नाही ती एक संधी आहे! एक स्वप्न आहे, तुमच्या आयुष्याला दिशा देणारं!

म्हणून यशाचं सूत्र लक्षात ठेवा, नियमित अभ्यास, योग्य दिशा, वेळेचं व्यवस्थापन, आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोन. जर तुम्ही या गोष्टींचं पालन केलं, तर तुमचं नाव निश्चितच निवड यादीत असेल.

शेवटी आई-वडिलांचा आशीर्वाद + शिक्षकांचं मार्गदर्शन + तुमची मेहनत = नवोदयमध्ये प्रवेश
तर मग वाट कसली पाहताय? स्वप्न बघा, मेहनत करा आणि ते साकार करा कारण तुमचं स्वप्न, तुमची मेहनत आणि तुमचंच नवोदय आहे!

----------------

(लेखक हे नवोदय,सैनिकी स्कूल, स्कॉलरशिप या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. ते करियर मार्गदर्शक असून मोटिव्हेशनल स्पिकर आहेत.)

■ ■ ■

## शिव भोळा चक्रवर्ती

आषाढ शुक्ल एकादशी पासून ते कार्तिक शुक्ल एकादशी पर्यंत चार महिन्याच्या च्या कालावधीला चातुर्मास असे म्हणतात. चातुमार्सात श्रावण, भाद्रपद, आश्विन आणि कार्तिक हे चार महिने येतात.

हिंदू धर्मात चातुमार्साला अतिशय पवित्र मानले असून, त्यांचे धार्मिकदृष्ट्या विशेष महत्व आहे. या काळात अनेक सण, उत्सव, व्रत, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरे केले जातात.

आषाढी एकादशीला देवशयनी एकादशी, तर कार्तिक एकादशीला देव उठणी एकादशी असेही म्हणतात. हिंदू धर्माच्या मान्यते प्रमाणे या सृष्टी चे पालन पोषण करण्याचे काम ज्या देवाकडे आहे, ते भगवान श्री विष्णू हे या चतुर्मासादरम्यान योग निद्रेत जातात व त्यामुळे या चार महिन्यात सृष्टीची जबाबदारी इतर देव देवतांकडे येते. श्रावण महिन्यात ती भगवान शिव यांचे कडे असते. त्यामुळे श्रावण महिन्यात शिवाच्या उपासनेला अधिक महत्व आहे.



प्रशांत चिंचोळकर
शिवाजी नगर, नागपूर.
9422158861

या संपूर्ण महिन्यात, महादेवाची पूजा अर्चा, अभिषेक, उपवास, कथा कीर्तन, पारायण, दान व धार्मिक उत्सव याद्वारे भक्तगन आपली आध्यात्मिक उन्नती करून घेतात. भगवान शिव- शंकर हे भोळे असून ते भक्तांवर लवकर प्रसन्न होतात. उपासना करणारा आपला भक्त कसा आहे, त्याच्या चांगल्या वाईटपणा बद्दल ते फारसा विचार करीत नाही.

ते केवळ भक्ती बघतात. त्यामुळे देव देवताच नाही तर दानव सुद्धा महादेवाची भक्ती, उपासना करतात अशी मान्यता आहे. याबाबत अनेक कथा पुराणात प्रसिद्ध आहेत. भस्मासूर नावाच्या राक्षसाने भगवान शकरांची उपासना करून त्यांना प्रसन्न केले व वर मागितला की मी ज्याच्या डोक्यावर हात ठेवील तो भस्मसात व्हावा. भगवान शंकर यांनी कसलाही विचार न करता त्याला तो वर दिला. व

रप्राप्तीनंतर भस्मासूर उन्मत होऊन शंकराच्याच डोक्यावर हात ठेवायला निघाला. पुढे श्री विष्णूंनी अप्सरेचे रुप घेऊन त्याला नृत्य करायला भाग पाडले, व स्वतः च्या डोक्यावर हात ठेवून भस्मासुरचा अंत झाला. या कथेनुसार भगवान महादेव आपल्या भक्तीने प्रसन्न होऊन कोणालाही वर देतात, त्यामुळे सर्वजण त्यांची भक्ती,उपासना करतात. हिंदू धार्मिक परंपरे नुसार श्रावण मास हा तर महादेवांच्या उपासने करिता महत्वाचा मानला जातो.

अशा शिव शंकराच्या बाबत एका अभंगात संत एकनाथ महाराज म्हणतात,

*शिव भोळा चक्रवर्ती, त्याचे पाय माझे चित्ती.*
*वाचे वदता शिव नाम, तया न बाधी क्रोध काम.*
*धर्म अर्थ काम मोक्ष, शिवा देखता प्रत्यक्ष.*
*एका जनार्दनी असे, निवारी कळी काळाचा भेव.*

कैलासाचे राजे, चक्रवर्ती असून सुद्धा भोळे असलेले, भगवान शिव शंकर यांच्या चरणी माझे चित्त स्थिर असू दे. केवळ मुखानेच नाही तर परा, पश्यन्ति अशा सुष्मातील सुष्म वाचेने सतत भगवान शंकरांचे सतत नामस्मरण केल्याने काम क्रोधाची बाधा होत नाही. शिवाच्या उपासनेने मानवी जीवनाचे लक्ष्य असलेल्या चार पुरुषार्थाची, धर्म अर्थ काम मोक्ष यांची प्राप्ती होते. त्याद्वारे चार ही पुरुषार्थाने मनुष्याचे जीवनाचे मूल्य सुधारते.

हे चार पुरुषार्थ म्हणजेच चार मूल्ये. धर्म म्हणजे आपले नैतिक मूल्य आहे.अर्थ म्हणजे समृद्धी हे आपले आर्थिक मूल्य आहे, काम म्हणजे आनंद व प्रेम हे आपले मनोवैज्ञानिक मूल्य आहे, तर मोक्ष म्हणजे मुक्ती हे आपले आध्यात्मिक मूल्य आहे.

हे सर्व मूल्य उत्तम प्रकारे प्राप्त करणे व ते टिकवणे हेच मनुष्य जीवनाचे सार्थक आहे, सर्व धर्मात यालाच पुरुषार्थ मानले असून भगवान शिवाच्या उपासनेने ते आपणास सहज प्राप्त होतात असे नाथ महाराज या अभंगात सांगतात.

तसेच ईश्वराच्या भक्तीने, उपासनेने मनुष्याचे सर्व दुःख व भीतीचा नायनाट होतो. शिवाच्या उपासनेने कळी काळाची सुद्धा भीती उरत नाही असा महिमा आहे. म्हणूनच श्रावण महिन्यात देवांचे देव महादेव, भगवान शंकरांच्या उपासनेला खूप महत्व आहे.

***ओम नमः शिवाय.....***

■ ■ ■

## अर्जाची छाननी होईपर्यंत योजना स्थगित करावी!

**वाचक लिहितात**

लोकसभेत मिळालेले अपयश विधानसभेत मिळू नये म्हणून राज्यातील युती सरकारने घिसाडघाईने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना लागू केली. इतकेच नव्हे तर दरमहा मिळणारे १५०० रुपये वाढवून ते २१०० करण्याचेही आश्वासन निवडणुकीच्या तोंडावर देण्यात आले. याचा हवा तसा लाभ महायुतीला झाला सुद्धा. राज्याची सत्ता पुन्हा एकदा महायुतीच्या हाती आली.

आता मात्र दरमहा १५०० रुपये देणेच सरकारला अवघड झाले आहे. राज्याच्या तिजोरीवर या योजनेचा मोठ्या प्रमाणावर ताण पडू लागला आहे ज्याचा परिणाम अन्य सरकारी योजनांवर होऊ लागला आहे, त्यातच या योजनेअंतर्गत झालेल्या गैरकारभाराची प्रकरणे बाहेर येऊ लागली आहेत. बंगला, चारचाकी गाडी असलेल्या, घरात नोकरचाकर असलेल्या तसेच सरकारी सेवेत असणाऱ्या महिलांनीही या योजनेचा लाभ घेतल्याची माहिती समोर आली . आतातर याच बाबतीत नवीन माहिती समोर आली आहे.

योजना सुरु झाल्यापासून राज्यातील सुमारे चौदा हजार तीनशे पुरुष घरातील महिलांच्या नावाने हा सरकारी मलिदा लाटत असल्याची बाब उघड झाली आहे ज्यांच्यावर आजतागायत एकवीस कोटीहून अधिक रक्कम सरकारी तिजोरीतून गेली आहे. अर्जाची जी छाननी ही योजना सुरु होण्याआधी करणे अपेक्षित होते ती आता केली जात आहे. परिणामी आजतागायत सरकारचे हजारो कोटी अपात्र लोकांना वाटण्यातच वाया गेले आहे.

सामान्य नागरिकांच्या घामाच्या पैशातून कररूपाने सरकार दरबारी जमा झालेल्या पैशाची सरकार सर्रासपणे उधळपट्टी करत आहे. अर्जाची छाननी अद्यापही सुरु असून आणखी काही माहिती भविष्यात उजेडात येण्याची शक्यता असून या योजनेतून जनतेचा किती पैसा वाया गेला त्याचे आणखी काही आकडे येणाऱ्या काळात पाहायला मिळणार आहेत.

आधीच जनतेचे कोट्यवधी रुपये अपात्र बहिणींना आणि बहिणींच्या नावाखाली पैसा लाटणाऱ्या पुरुषांना वाटण्यात गेले आहेत. आणखी पैशांचा दुरुपयोग नको व्हायला म्हणून सरकारने अजार्ची नीट आणि पूर्णपणे छाननी होईपर्यंत या योजनेला स्थगिती द्यावी.

**सौ. मोक्षदा घाणेकर**
**काळाचौकी, मुंबई.**

## चीनची उत्पादने टाकू या, राष्ट्र आणि धर्म हित जपू या!

भारतीयांसाठी चातुर्मास म्हणजे अतिशय आध्यात्मिक वातावरणाचा, पूजा-पाठाचा आणि धार्मिक साधनेचा विशेष काळ असतो. या काळात अनेक प्रमुख सण येतात. त्यामुळे पूजेसाठी लागणारे विविध साहित्य जसे की उदबत्ती, धूप, दीप इत्यादी बाजारात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असते. त्यातही उदबत्ती आणि धूप यांना विशेष महत्त्व असते, कारण ते वातावरण शुद्ध करण्यासाठी वापरले जातात. मात्र अलीकडे काही परदेशी संशोधनातून असा दावा करण्यात आला आहे की, उदबत्तीचा धूर सिगारेटपेक्षा जास्त हानिकारक असतो आणि त्यामुळे कर्करोगाचा धोका संभवतो. हे संशोधन 'साऊथ चायना टोबॅको ग्वांगडोंग इंडस रेल्वे आस्थापनांनी संयुक्तपणे केले आहे. त्यांच्या अभ्यासात उदबत्तीच्या धुराच्या नमुन्यांमध्ये ९९% अतिसूक्ष्म कण आढळले, जे शरीरासाठी हानिकारक ठरू शकतात, असे निष्कर्ष नोंदवले गेले. परंतु हे संशोधन चिनी उदबत्त्यांवर आधारित आहे. चीनमध्ये तयार होणाऱ्या उदबत्त्यांमध्ये रासायनिक व घातक घटकांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. याउलट आपल्या भारतात अनेक आध्यात्मिक संस्था यज्ञातील विभूती, गोमूत्र, औषधी वनस्पती अशा नैसर्गिक आणि आरोग्यदायी घटकांचा वापर करून उदबत्ती तयार करतात. त्यामुळे हे संशोधन भारतीय उदबत्त्यांवर लागू होत नाही. त्यामुळे चातुमार्सातील सणांच्या पार्श्वभूमीवर बाजारात मिळणा?या चायनीज उदबत्त्यांचे आकर्षण टाळावे. फक्त किंमत आणि देखाव्याला भुलून अशा घातक वस्तू खरेदी करू नयेत.

■ **सौ. रमा देशमुख, नागपूर.**

## रिकाम्या पोटी कडुलिंबाची पाने खाल्ल्याने आरोग्यावर कसा परिणाम होतो?



आयुर्वेदात कडुलिंबाला फक्त एक झाडच नाही तर एक नैसर्गिक औषध मानले जाते. ते सर्व रोग निवारणी म्हणजेच सर्व रोगांचे उच्चाटन करणारे असल्याचे म्हटले जाते.

विशेषतः दररोज सकाळी रिकाम्या पोटी कडुलिंबाची पाने खाणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते. या बाबात आरोग्यतज्ञांच्या मते, यांनी रिकाम्या पोटी कडुलिंब खाण्याचे असे काही फायदे सांगितले आहेत. त्यांच्याबद्दल तसेच ते खाण्याची योग्य पद्धत जाणून घेऊया.

**रोगांपासून बचाव** : तज्ञांच्या मते, कडुलिंबाच्या पानांमध्ये अँटीबॅक्टेरियल, अँटीव्हायरल आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात, जे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात. यामुळे सर्दी, फ्लू आणि ताप यांसारख्या हंगामी आजारांपासून संरक्षण मिळते.

**रक्त शुद्धीकरण** : तज्ञांच्या मते, कडुलिंब रक्त शुद्ध करते. ते त्वचेला उजळवते आणि मुरुम, ॲलर्जी किंवा फोड यासारख्या समस्या दूर करते.

**साखर नियंत्रण** : डॉक्टरांच्या मते, काही संशोधनांच्या निष्कर्षांवरून असे दिसून येते की कडुलिंबाचे सेवन रक्तातील साखरेचे प्रमाण संतुलित करते, ज्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांना आराम मिळू शकतो.

**पचनक्रिया निरोगी राहते** : कडुलिंब यकृत आणि आतडे स्वच्छ करते. ते गॅस, बद्धकोष्ठता आणि अपचन यासारख्या समस्या कमी करते. अशा परिस्थितीत, पचनक्रिया बिघडलेल्या लोकांसाठी ते फायदेशीर ठरू शकते.

**दातांसाठी फायदेशीर** : प्राचीन काळापासून असे मानले जाते की कडुलिंबाने दात घासल्याने दात मजबूत होतात, हिरड्या निरोगी राहतात आणि तोंडाची दुर्गंधी देखील दूर होते.

**चमकदार त्वचा आणि मजबूत केस** : या सर्वांव्यतिरिक्त, तज्ञ म्हणतात की कडुलिंबाचा रस किंवा तेल लावल्याने कोंडा, मुरुम आणि त्वचेच्या ॲलर्जीपासून आराम मिळतो. यासोबतच त्वचा आतून स्वच्छ होते.

**सेवन कसे करावे?**
यासाठी दररोज सकाळी रिकाम्या पोटी ४-५ मऊ कडुलिंबाची पाने धुवून चावा. जर त्याची चव खूप कडू असेल तर तुम्ही ते कोमट पाण्याने गिळू शकता. किंवा तुम्ही पाण्यात मिसळून कडुलिंबाचा रस (२०-३० मिली) देखील पिऊ शकता. डॉक्टर म्हणतात की कडुलिंबाचे सर्व फायदे असूनही, ते जास्त प्रमाणात सेवन करू नका. तसेच, गर्भवती महिला, लहान मुले आणि कमकुवत पचनसंस्था असलेल्यांनी डॉक्टरांना विचारल्यानंतरच ते त्यांच्या दिनचर्येत समाविष्ट करावे.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### माशी कुठे शिंकली?

**महागडे बियाणे शेतात पेरले**
**ढग फुटीने सारे वाहून गेले**
**पंचनामे करा फर्मान सुटले**
**सोपस्कार सारे पार पडले**

**पंचनामे होवून महिने**
**उलटून जाती**
**मदतीचे आश्वासन**
**हवेतच विरती**

**सलायनवर हाय**
**बळीचा जीव**
**अधिवेशन संपलं पण**
**आली नाही कीव...**

## नालीच्या पाणीने आरोग्यास धोका

**महासागर तालुका प्रतिनिधी**
**राजुरा दि. ०१ ऑगस्ट :** राजुरा शहरातील जवाहर नगर माता मंदिर जवळील नालीचे पाणी निघण्याकरीता मोकळ्या जागेत केलेली कच्ची नाली बंद केल्याने नालीतील पाणी वाहून जाण्याचा अडचण निर्माण झाली होती. याबाबत नागरीकांनी वर्षभरापासून नालीचे पाणी वाहते करण्याबाबत विनंती केली होती परंतू नगर परिषदेने याकडे दुर्लक्ष केल्याने काल झालेल्या पावसामुळे नालीतील सांडपाणी रस्त्यावर पसरले असून नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. जवाहरनगर वार्डामध्ये ज्योतीबा शाळा ते माता मंदिर पर्यत नगर परिषदेने पक्क्या नालीचे बांधकाम केलेले होते.

## वेकोलीचा मोबदला वाढवून मिळणार

**महासागर प्रतिनिधी**
**चंद्रपूरे, दि. ०१ जुलै :** वेकोलि बल्लारपूर क्षेत्र अंतर्गत, बल्लारपूर नॉर्थ वेस्ट खुली खदान प्रकल्पातील मागास व अन्य प्रवर्गातील शेतकऱ्यांनी दि. २७ जुलै रोजी राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांची प्रत्यक्ष भेट घेवून या प्रकल्पासाठी मिळणारा प्रति एकर आर्थिक मोबदल्यामध्ये दरवाढ मिळवून देण्याविषयी चर्चा केली यावेळी भाजयुमोचे प्रदेश उपाध्यक्ष रघुवीर अहीर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.जिल्हा भाजपा सचिव मधुकर नरड, पूर्व जिल्हाध्यक्ष किसान आघाडी राजु घरोटे, कोलगाव उपसरपंच पुरूषोत्तम लांडे यांचे नेतृत्वात शेकडो शेतकऱ्यांनी हंसराज अहीर यांना या आशयाचे निवेदन सादर केले.

# रेल्वे फाटकच्या अपूर्ण पुलामुळे घुग्घुसवासीय महिला संतप्त

### सर्व्हिस रोडशिवाय पुलाचे बांधकाम सुरू,त्वरित काम सुरू न केल्यास १६ ऑगस्टला रेल रोको आंदोलन, पत्रकार परिषदेत घुग्घुसच्या सर्व महिलांचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**
**चंद्रपूर, दि. १ ऑगस्ट :** घुघुसमध्ये जी ३९ रेल्वे गेट आणि अपूर्ण रेल्वे पुलाच्या बांधकामामुळे रेल्वे गेट वर मोठ्या प्रमाणात वाहतुकीची समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे काही प्रकारचे छोटे-मोठे अपघात होत आहेत. या अपघातांमध्ये अनेक नागरिकांना आपले प्राण गमवावे लागत आहेत. शहरवासीयांसाठी कोणत्याही सर्व्हिस रोडशिवाय रेल्वे पुलाचे बांधकाम सुरू करण्यात आले. त्यामुळे शहरवासीयांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. पुलाचे बांधकामात अनेक प्रकारचे भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत, माला मेश्राम आणि घुग्घुसच्या काही




महिलांनी पुलाचे बांधकाम लवकर सुरू केले नाही तर १६ ऑगस्टला रेल रोको आंदोलन करण्याचा इशारा पत्र परीषदेत दिला आहे.

गेल्या ३ वर्षांपासून जी-३९ रेल्वे गेट वारंवार आणि दीर्घकाळ बंद राहिल्याने आणि रेल्वे उड्डाणपुलाच्या बांधकामात होत असलेल्या विलंबामुळे नागरिकांचा संयम सुटला आहे. या समस्येमुळे मुलांचे शिक्षण, रुग्णांवर उपचार, महिलांची सुरक्षितता आणि सामान्य जीवनावर वाईट परिणाम होत आहे. सतत वाहतूक कोंडी, वायू प्रदूषण आणि वेळेचा अपव्यय या भागात होत आहे.

जी-३९ रेल्वे गेट दिवसातून अनेक वेळा बंद राहते, त्यामुळे रुग्णवाहिका, स्कूल बस, जड ट्रक आणि अत्यावश्यक सेवा ठप्प होतात. जड ट्रकांमुळे गेटवरील वाहतूक पूर्णपणे ठप्प होते. जड वाहतुकीमुळे लहान वाहनेही त्यात अडकतात.

यातुनच १२ जुलैला एक अपघातात गर्भवती महिला आणि बाळाला जीव गमवावा लागला. गेल्या ३-४ वर्षांपासून नवीन रेल्वे पूल अपूर्ण आहे, त्यामुळे वाहतुकीचा संपूर्ण ताण जुन्या रेल्वे फाटकावर आहे. या समस्येवर ३ ऑगस्ट रोजी महिलांनी आयोजित केलेल्या रास्ता रोको आंदोलनाबाबत घुग्घुस पोलिस ठाण्यात बैठक घेण्यात आली.

ज्यामध्ये जनरल रेल्वे अधिकारी डीजीएम सिव्हिल पी. श्रीकांत, वेकोली अधिकारी टिपले, रेल्वे संरक्षण दलाचे अधिकारी बलवीर सिंग, पोलिस निरीक्षक प्रकाश राऊत, रेल्वे विभागाचे अधिकारी विकास प्रसाद, आंदोलक माला मेश्राम, संजय तिवारी, साजन गोहणे आणि इतर कामगार उपस्थित होते.

बैठकीत पुलाचे बांधकाम त्वरित पूर्ण करावे, रेल्वे फाटक वारंवार बंद होत असल्याने उपाययोजना कराव्यात, राजीव रतन चौकात २४ तास पोलिस नियुक्त करावे, राजीव रतन चौकातील खड्डे तातडीने भरावे, जड वाहतुकीच्या वेळेचे नियोजन करावे अशा मागण्या करण्यात आल्या. अधिकाऱ्यांनी बैठकीत काम १५ दिवसांत पूर्ण होईल असे लेखी आश्वासन दिल्याची माहिती मेश्राम यांनी दिली.

अधिकाऱ्यांच्या आश्वासनामुळे ३ ऑगस्टचे रास्ता रोको आंदोलन पुढे ढकलण्यात आले आहे. जर १५ दिवसांत काम पूर्ण झाले नाही तर १६ ऑगस्ट रोजी घुग्घुसच्या सर्व महिलां द्वारे रेल्वे रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

पत्रपरिषदेत माला मेश्राम, सुरेखा भोयर, उज्वला उईके, अनिता कोल्हे, अलका चुनारकर, भारती निमसटकर आदी उपस्थित होते.

# वसाहती शेजारीच कब्रस्तानाचे बांधकाम रहिवाशांचा विरोध : पत्र परिषदेत माहिती

**महासागर तालुका प्रतिनिधी**
**भद्रावती, दि. १ ऑगस्ट :** येथील संताजी नगर लगत असलेल्या गुलमोहर कॉलनीला लागूनच कब्रस्तानाचे बांधकाम सुरू आहे. हे बांधकाम संबंधित शासकीय विभागाने त्वरित थांबवून काढून टाकावे अन्यथा आंदोलन करू असा इशारा स्थानिक रहिवाशांनी पत्र परिषदेत दिला. स.नं.१८८ ही खासगी जागा २०१४ मध्ये अकृषक करण्यात आली. त्या ठिकाणी अनेकांनी प्लॉट विकत घेऊन घरांचे बांधकाम केले आणि रहावयास सुद्धा आले आहेत. गुलमोहर कॉलनी या नावाने परिचित असलेल्या या कॉलनी लगतच सर्वे नंबर १८७ आहे.

हि जागा शासकीय असून काही दिवसांपूर्वी एका समाजाच्या समूहाने या कॉलनी लगतच कब्रस्तानाचे बांधकाम सुरू केले. बांधकाम ठेकेदार कलीम शेख यांनी सुरुवातीस




या ठिकाणी स्थानिक रहिवाशांसाठी बगीचा होत असल्याचे सांगितले. मात्र संरक्षण भिंत पूर्ण झाल्यानंतर याच ठेकेदाराने या ठिकाणी कब्रस्तान होत असल्याची माहिती दिली. त्यामुळे हादरलेल्या येथील रहिवाशांनी याबाबत नगरपरिषद आणि तहसील कार्यालयात हे काम थांबवण्या करिता आणि केलेले बांधकाम काढून टाकण्याकरिता निवेदन दिले. वसाहतीला लागूनच कब्रस्तान झाल्यास या ठिकाणी राहणारी लहान मुले महिला यांच्या मानसिकतेवर परिणाम होईल अशी भीती तेथील नागरिकांनी व्यक्त केली. पत्र परिषदेला रहिवाशी सुरेश चापले, शंकर नागपुरे, भाग्यश्री वाकडे, रमेश नागपुरे, ज्योती शेरकी, संजय नंदनवार, कुणाल चापले, योगेश वाघमारे, प्रीती आत्राम, सुनीता नागपुरे, आशिष मून, राकेश आत्राम, मनोज वऱ्हाटे, चेतन भाकरे आदी रहिवासी उपस्थित होते.

# खासदार प्रतिभा धानोरकरसह शिष्टमंडळाची केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भेट

### डोळयांच्या उपकरणांवरील जीएसटी, सीमाशुल्क माफ करा

**महासागर प्रतिनिधी**
**चंद्रपूर, दि. १ ऑगस्ट :** सार्वजनिक आरोग्याची निकड आणि देशातील कोट्यवधी नागरिकांची गरज लक्षात घेऊन दृष्टी-बचत करणाऱ्या डोळ्यांच्या उपकरणांवरील जीएसटी आणि सीमाशुल्क माफ करण्याची शिफारस केली आहे. तसेच सहकारी आणि खाजगी क्षेत्रातील निवृत्त झालेल्या सुमारे ७८ लाख पेन्शनधारकांच्या मागण्यांची दखल घेण्याची विनंती खासदार प्रतिभा धानोरकरसह शिष्टमंडळाची केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भेट घेऊन केली आहे.



याच मागणीला पाठिंबा देत, खासदार प्रतिभा धानोरकर यासह खासदार डॉ. शिवाजी काळगे, खासदार डॉ. शोभा बचाव, खासदार प्रा. वर्षा गायकवाड, खासदार डॉ. कल्याण काळे, खासदार बळवंत वानखेडे यांच्यासह अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भेट घेतली.

खासदार प्रतिभा धानोरकर यांनी त्यांच्या पत्रात नमूद केले आहे की, 'ऑल-इंडिया ऑप्थल्मोलॉजिकल सोसायटी' (AIOS) ने या उपकरणांवरील कर पुन्हा लागू केल्यामुळे त्यांच्या किमतीत मोठी वाढ झाली असून, त्यामुळे गरीब आणि गरजू रुग्णांना डोळ्यांची योग्य काळजी घेणे अवघड झाले आहे. देशात करोडो लोकांना दृष्यदोष किंवा अंधत्वाचा त्रास होत आहे, ज्यापैकी बहुतांश लोक आर्थिकदृष्ट्या दुर्बळ आहेत.

या उपकरणांवरील ७.५-१०% सीमाशुल्क आणि १२% जीएसटीमुळे आवश्यक उपचारांचा खर्च वाढला आहे. याचा थेट परिणाम धर्मादाय आणि सार्वजनिक आरोग्य संस्थांच्या कार्यावर होत असून, त्यांना अनुदानित किंवा मोफत नेत्रसेवा पुरवण्यात अडचणी येत आहेत.

खासदार प्रतिभा धानोरकर यांनी पत्रात पुढे म्हटले आहे की, भारत सरकारने यापूर्वी 'नोटिफिकेशन ६९/९३-र्' अंतर्गत या उपकरणांना सूट दिली होती. ही सूट पुन्हा लागू केल्यास 'राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम' आणि 'व्हिजन २०३०' यांसारख्या राष्ट्रीय उपक्रमांना बळ मिळेल.

## रासायनिक खतांच्या विक्रीसाठी ई - पॉस प्रणाली बंधनकारक १० ऑगस्ट पूर्वी मशीन प्राप्त करून घेण्याचे आवाहन

**महासागर प्रतिनिधी**
**चंद्रपूर, दि. १ ऑगस्ट :** अनुदानित रासायनिक खतांची विक्री ही ई-पॉस (e-PoS) प्रणालीच्या माध्यमातून करणे बंधनकारक आहे. खत विक्रीच्या नोंदी तात्काळ आणि अचूक पद्धतीने प्रणालीमध्ये समाविष्ट करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. ई-पॉस स्टॉक व प्रत्यक्ष साठा समान असणे : विक्रेत्यांच्या ई-पॉस प्रणालीवरील खत साठा व प्रत्यक्ष गोडाऊनमधील साठा यामध्ये कोणतीही तफावत असू नये. यासाठी रासायनिक खतांच्या विक्रीची नोंद iFMS प्रणालीमध्ये त्याच क्षणी घेणे बंधनकारक आहे.

# प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत लाभार्थ्यांसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू

**महासागर प्रतिनिधी**
**चंद्रपूर, दि. १ ऑगस्ट :** चंद्रपूर शहर महानगर पालिकेमार्फत 'प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.०' योजना राबविली जात असुन या अंतर्गत दोन प्रकारांत अर्ज मागविण्यात येत आहेत. यातील वैयक्तिक स्वरूपातील घरकुल बांधकाम हा पहिला व तर भागीदारी तत्वावर परवडणारी घरे हा दुसरा घटक आहे.

यातील वैयक्तिक स्वरूपातील घरकुल बांधकाम घटकांतर्गत चंद्रपूर शहरातील ज्या नागरिकांकडे स्थायी पट्टे (स्वतः मालकीची जागा) आहे (बांधकाम प्रतिबंधित क्षेत्र वगळता) त्यांना घरकुलाचा लाभ घेण्यास (रु. २.५० लक्ष अनुदान) अर्ज करता येतो. तसेच भागीदारी तत्वावर परवडणारी घरे या घटकांतर्गत ज्या नागरीकांकडे स्वमालकीची जागा अथवा जमीन उपलब्ध नाही व चंद्रपूर शहरात भाडेकरू म्हणून वास्तव्यास आहेत अशा नागरिकांना अर्ज सादर करता येणार आहे.

पंतप्रधान महोदयाच्या 'सर्वांसाठी घरे' या संकल्पनेच्या अंतर्गत केंद्र पुरस्कृत 'प्रधानमंत्री आवास योजना' आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व गरजू नागरिकांसाठी सुरु करण्यात आली आहे. या योजनेचा दुसरा टप्पा १ सप्टेंबर २०२४ पासुन राबविण्यात येत आहे.ही योजना महिला सदस्याच्या नावावर किंवा संयुक्त नावावर घर/जमिनीची मालकी देऊन महिला सक्षमीकरणाला प्रोत्साहन देते. या योजनेअंतर्गत, शहरी भागातील झोपडपट्टीवासीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), कमी उत्पन्न गट (LIG) आणि मध्यम उत्पन्न गट (MIG) श्रेणीतील इतर लोकांना प्राधान्य दिले जाते.

# जनतेच्या प्रेमातून मिळते गरिबांची सेवा करण्याची ऊर्जा

### आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केली भावना

**महासागर प्रतिनिधी**
**चंद्रपूर, दि. १ ऑगस्ट :** लोकांचे प्रेम मिळत आहे म्हणूनच सर्वसामान्यांचा आवाज होऊन सभागृहात लढणे शक्य होत आहे. या प्रेमामुळेच गरिबांची सेवा करण्याची ऊर्जा मिळते. या प्रेमाच्या कर्जातून कधीही मुक्त होऊ शकणार नाही, या शब्दांत राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

बल्लारपूर येथील माजी नगरसेवक महेंद्र ढोके यांनी आयोजित केलेल्या सोहळ्यात लाडक्या बहिणींनी आ. मुनगंटीवार



यांचा वाढदिवसाच्या निमित्ताने जाहीर सत्कार केला. त्यावेळी आ. मुनगंटीवार बोलत होते. या कार्यक्रमाला वनविकास मंडळाचे माजी अध्यक्ष चंदनसिंग चंदेल, भाजपा बल्लारपूर शहराध्यक्ष रणंजय सिंह, माजी अध्यक्ष काशी सिंह, निलेश खरबडे, समीर केणे, मनीष पांडे, देवेंद्र वाटकर, सतीश कनकम, कांता ढोके, जयश्री मोहुर्ले, रेणुका दुधे, पुनम मोडक, सुवर्णा भटारकर, विद्या देवाळकर, सचिन जाधव, सारिका कनकम, आरती आक्केवार, किशोर मोहूर्ले, विक्की दुपारे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

आ. मुनगंटीवार म्हणाले, 'माझा वाढदिवस आपण सेवादिन म्हणून साजरा केलात, सर्वांच्या साक्षीने प्रेम व्यक्त केले, त्याबद्दल आभारी आहे. गरिबांच्या चेहऱ्यावरचा आनंद हेच आमचे ध्येय आहे. एखादा कार्यकर्ता अश्यापद्धतीने जनतेची, निराधारांची सेवा करतो. गरिबांचे प्रश्न सोडविण्यासाठी पूर्ण शक्तीने काम करतो, तेव्हा खूप आनंद होतो. भारतीय जनता पार्टीची खरी संपत्ती महेंद्र ढोके यांच्यासारखे कार्यकर्ते आहेत.'

## 'मैत्री' कडून उद्योजकांना मोफत शासकीय मार्गदर्शन सेवा

**महासागर प्रतिनिधी**
**चंद्रपूर, दि. १ ऑगस्ट :** राज्यातील नवउद्योजक, लघु व मध्यम उद्योग तसेच निर्यात क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यावसायिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा, उद्योग स्थापनेसाठी आवश्यक मार्गदर्शन सहज उपलब्ध व्हावे या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाने 'मैत्री' या विशेष कक्षाची स्थापना केली आहे. या कक्षामार्फत एक मोफत कॉल सेंटर सेवा कार्यरत असून या सुविधेद्वारे नवोदित आणि सध्या कार्यरत असलेल्या उद्योजकांना विविध विषयांवर मार्गदर्शन मिळू शकते. यात महाराष्ट्रात नवीन उद्योग सुरू करण्याची प्रक्रिया, उद्योगासाठी लागणारे परवाने, लायसन्स, नाहरकत प्रमाणपत्र कसे मिळवावेत याचा समावेश आहे.

# महापालिकेने त्या पुतळ्याचे बांधकाम तातडीने थांबवावे

### काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रामू तिवारी यांच्या उपस्थितीत महानगरपालिका आयुक्तांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**
**चंद्रपूर, दि. १ ऑगस्ट :** शहर पोलीस स्टेशन आणि सात मजली इमारत यांच्या मधोमध असलेल्या जागेवर चंद्रपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून अचानक एका पुतळ्याचे बांधकाम सुरू करण्यात आले आहे. ही जागा सध्या पुरातत्व विभागाच्या देखरेखीखाली असतानाही कोणतीही पूर्वसूचना अथवा परवानगी न घेता सुरू करण्यात आलेल्या या कामाबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या अनधिकृत कामाचा तीव्र निषेध करत चंद्रपूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष रितेश (रामू)



तिवारी यांनी हे बांधकाम तातडीने थांबविण्याची मागणी केली. त्यांनी या संदर्भात महानगरपालिका आयुक्त विपिन पालीवाल यांना निवेदन सादर करून सदर बांधकामास त्वरित स्थगिती देण्याची मागणी केली आहे.

चंद्रपूर शहरातील सात मजली समोरील फुटपाथ वर स्व. गंगुबाई जोरगेवार (अम्मा) टोपल्या विकायला बसायच्या. त्या सदर जागेला परिसराला 'अम्मा चौक' असे नांव देण्याबाबत मनपा प्रशासकाने मान्यता प्रदान केली. चंद्रपूर शहरातील स्वातंत्र्य संग्राम सैनिक, समाजसेवक, माजी लोकप्रतिनिधी यांच्या कार्याची आठवण ठेवून मनपाने कधीच स्मारक बनण्याचा विचार केला नाही. मात्र एखादी महिला त्या ठिकाणी टोपल्या विकत होती म्हणून त्या परिसराला त्यांचे नाव देणे कितपत योग्य आहे. हा संपूर्ण परिसर गांधी चौक म्हणून ओळखला जातो मात्र ही ओळख पुसण्याचा डाव आखण्यात देत आहे, असा आरोप तिवारी यांनी केला. तिवारी यांनी सांगितले की, हा परिसर पुरातत्व विभागाच्या संरक्षणाखाली येतो. त्या जागेवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करणे कायद्याच्या विरोधात आहे. अशा प्रकारची कारवाई केल्यास शहरातील ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाला धोका पोहोचू शकतो. महानगरपालिकेने या प्रकरणी तातडीने खुलासा करावा आणि संबंधित काम थांबविण्याची कारवाई करावी, अशी मागणी देखील या निवेदनात करण्यात आली आहे.

# आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून ३५ रुग्ण शस्त्रक्रियेसाठी आचार्य विनोबा भावे रुग्णालयात रवाना

### देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताह निमित्त आयोजित महाआरोग्य शिबिरात करण्यात आली होती तपासणी

**महासागर प्रतिनिधी**
**चंद्रपूर, दि. १ ऑगस्ट :** आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून भारतीय जनता पक्षाच्या वतीने घेण्यात आलेल्या देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताहाच्या अंतर्गत आयोजित महाआरोग्य शिबिरात अनेक रुग्णांमध्ये गंभीर स्वरूपाचे आजार आढळून आले. या रुग्णांवर निशुल्क शस्त्रक्रिया करण्यात येणार असून, पहिल्या टप्प्यात ३५ रुग्णांना सावंगी मेघे येथील आचार्य विनोबा भावे रुग्णालयात रवाना करण्यात आले.

या रुग्णांना आमदार किशोर



जोरगेवार यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या वतीने बसच्या माध्यमातून पाठविण्यात आले. यावेळी भारतीय जनता पार्टीचे महानगराध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, नामदेव डाहुले, ॲड. राहुल घोटेकर, प्रसाद जोरगेवार आदींची उपस्थिती होती.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून भारतीय जनता पार्टी, चंद्रपूर विधानसभा मतदार संघाच्या वतीने देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहात विविध सेवाभावी उपक्रम राबविण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून शकुंतला लॉन येथे महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात मुंबईसह संपूर्ण विदर्भातील तज्ज्ञ डॉक्टरांनी सेवा दिली. यात पाच हजारांहून अधिक रुग्णांची तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान अनेक रुग्णांमध्ये हृदयरोग, कॅन्सर, अस्थिरोग, नेत्ररोग यांसारखे गंभीर आजार आढळून आले. यावर सर्व उपचार निशुल्क करण्यात येत असून, काही रुग्णांवर शस्त्रक्रिया करणे आवश्यक ठरले आहे. आजच्या पहिल्या टप्प्यात ३५ रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी सावंगी मेघे रुग्णालयात रवाना करण्यात आले असून, येत्या दिवसांत उर्वरित रुग्णांनाही टप्प्याटप्प्याने शस्त्रक्रियेसाठी पाठविण्यात येणार आहे.

# १ ते ७ ऑगस्ट पर्यंत साजरा होणार महसूल सप्ताह

**महासागर प्रतिनिधी**
**चंद्रपूर, दि. १ ऑगस्ट :** जिल्हास्तरीय महसुली कामे वेळेच्या वेळी पूर्ण करून त्यानुसार अभिलेख अद्ययावत करणे, मोजणी करणे, अपील प्रकरणांची चौकशी करणे, महसूल गोळा करणे तसेच संबंधित कामे उत्कृष्ट पध्दतीने करणा-या व महसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करणा-या अधिकारी आणि कर्मचा-यांचा सत्कार करण्यासाठी दरवर्षी १ ऑगस्ट हा महसूल दिन म्हणून साजरा करण्यात येतो.



तसेच महसूल विभागाकडून देण्यात येणा-या सेवा आणि विभागाकडून राबविण्यात येणा-या विविध योजनांबाबत नागरिकांमध्ये जागरुकता वाढावी, शासनाबद्दल आणि शासनाच्या कामकाजाबद्दल नागरिकांचा विश्वास वृध्दिंगत व्हावा, यासाठी विशेष मोहीम व लोकाभिमुख उपक्रम राबविण्याच्या उद्देशाने १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्याच्या सुचना शासनाने दिल्या आहेत. या अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. असे राहील महसूल सप्ताहाचे स्वरुप : १ ऑगस्ट रोजी महसूल दिन साजरा करणे व महसूल सप्ताहाचा शुभारंभ होईल. महसूल संवर्गातील कार्यरत /सेवानिवृत्त अधिकारी -कर्मचारी यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण व लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्र वितरण समारंभ. २ ऑगस्ट रोजी शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबांपैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटुंबांना अतिक्रमित जागांचे पट्टे वाटप कार्यक्रम. ३ ऑगस्ट रोजी पाणंद/शिवरस्त्यांची मोजणी करून रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावणे. ४ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान प्रत्येक मंडळनिहाय राबविणे. ५ ऑगस्ट रोजी विशेष सहाय्य योजनेतील डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी करून अनुदानाचे वाटप करणे.

६ ऑगस्ट रोजी शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करणे. ७ ऑगस्ट रोजी एम. सँड धोरणाची अंमलबजावणी करणे व नवीन मानक कार्यप्रणालीप्रमाणे धोरण पूर्णत्वास नेणे आणि महसूल सप्ताह सांगता समारंभ आयोजित करण्यात येणार आहे.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर
मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक
मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३
* स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी * (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)



# बालांगण

## वैविध्यपूर्ण बुद्धिबळपट

नॉलेज

दोस्तांनो, बुद्धिबळ खेळताना आपल्या मेंदूचा कस लागतो. या खेळातली प्रत्येक चाल हुशारीने खेळावी लागते. भारतानेच जगाला बुद्धिबळाची देणगी दिली. विश्वनाथन आनंदने ग्रँडमास्टर म्हणून नाव कमावलं. तुम्हालाही बुद्धिबळ येत असेल, तुमच्याकडेही बुद्धिबळाचा पट असेल. पण जगभरात वैशिष्ट्यपूर्ण बुद्धिबळाचे पट पहायला मिळतात. अशाच काही आखीव रेखीव आणि सुंदर बुद्धिबळपटांवर नजर टाकू या.

* बुद्धिबळपट सोन्या-चांदीचेही असतात. या पटांचा वापर खेळण्यासाठी नाही तर सजावटीसाठी केला जातो.
* जर्मनीमध्ये बीच वूडपासून अनोखा बुद्धिबळपट बनवण्यात आला आहे. सर्वसामान्य बुद्धिबळपटांच्या तुलनेत हा पट थोडा छोटा आहे. पण तो खूपच आकर्षक आहे.
* 'अॅप्रोच द बेंच' नावाचा एक बुद्धिबळपट आहे. वकिलांना समोर ठेऊन हा पट बनवण्यात आला आहे. या पटाच्या सोंगट्या पितळेच्या आहेत. तसंच या पटावरचे चौकोन काळेपांढरे नाहीत तर कोर्टरूमप्रमाणे चॉकलेटी लालसर रंगाचे आहेत.



* रोमन ग्लॅडिएटर्स थ्रीडी हा अनोखा बुद्धिबळपट आहे. या बुद्धिबळपटाची रचना थ्रीडी तंत्रज्ञानाने करण्यात आली आहे. शिवाय याच्या सोंगट्याही अनोख्या आहेत.
* बर्न जगरेब ५९ मालिकेतला बुद्धिबळपट खूप सुंदर आहे. याच्या सोंगट्यांवर कोरीव काम करण्यात आलं आहे.

## सोने पे सुहागा...

गंमतगोष्टी

आरती देशपांडे

छोट्या दोस्तांनो, हिंदीमधली 'सोने पे सुहागा' हा वाक्प्रचार तुम्हाला माहिती असेल. पण याचा अर्थ ठाऊक आहे का? सोने आधीच मौल्यवान असते. पण त्यावर सुहागा लावल्यास चमक वाढते. म्हणूनच हा वाक्प्रचार चांगल्या गोष्टीत आणखी चांगले गुण जोडण्यासाठी वापरला जातो. उदाहरणार्थ, एखादा विद्यार्थी परीक्षेत अव्वल झाला आणि शिष्यवृत्तीही मिळाली तर त्याला 'सोने पे सुहागा' असे म्हणता येईल.

सुहागाला इंग्रजीमध्ये बोरॅक्स म्हणतात. हे एक नैसर्गिक खनिज असून त्याचे रासायनिक नाव सोडियम बोरेट असे आहे. ते पांढऱ्या पावडर किंवा क्रिस्टलच्या स्वरूपात आढळते आणि विविध घरगुती, औद्योगिक आणि आयुर्वेदिक उपचारांमध्ये वापरले जाते.



आता बोरॅक्स कोणत्या कामात वापरले जाते, हेदेखील पाहू या.

* बोरॅक्सचा वापर सोने आणि चांदीचे दागिने स्वच्छ करण्यासाठी आणि चमकवण्यासाठी सर्वात जास्त केला जातो. ते धातूतील अशुद्धता काढून टाकते आणि चमक वाढवते.
* खोकला, घसा खवखवणे आणि सांधेदुखीवर उपचार करण्यासाठी पारंपरिक औषधांमध्ये बोरॅक्सचा वापर केला जातो.
* पूर्वी कपडे धुण्यासाठी आणि डाग काढण्यासाठी बोरॅक्सचा वापर केला जात असे.

## नव्या युगातला आरसा

टेक नॉलेज



मुलींनो, सध्या अनेकजण फिटनेसबाबत जागरूक झाले आहेत. फिट राहण्यासाठी, वजन कमी करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची डाएट्स केली जातात. जीममध्ये घाम गाळला जातो. विविध कंपन्या फिटनेस बँड्स बनवतात. हे बँड आपली आरोग्यविषयक माहिती साठवून ठेवतात. अमेरिकेतल्या 'मिरर' नावाच्या कंपनीने आरशासारखं उपकरण तयार केलं आहे. हा स्मार्ट मिरर आहे. हा मिरर फिटनेसबाबत मार्गदर्शन करणार आहे. या स्मार्ट मिररमधलं स्मार्ट तंत्रज्ञान समजून घेऊ. हा स्मार्ट मिरर स्मार्टफोनला कनेक्ट करून वापरता येईल. स्मार्ट मिररसाठी खास अॅपही तयार करण्यात आलं आहे. या अॅपद्वारे व्यायामाचा प्रकार निवडता येईल. यात जॉगिंग, योगा, जीम, स्ट्रेंथ ट्रेनिंग असे बरेच पर्याय आहेत. यात कॅमेरा, ऑडियो सिस्टिम आणि स्पीकर्स आहेत.

या स्मार्ट मिररमध्ये एलईडी डिस्प्ले बसवण्यात आला आहे. हा मिरर युजरला व्यायाम करण्याची प्रेरणा देईल. व्यायामाच्या वेळेची आठवणही करून देईल. तुम्ही किती वेळ व्यायाम करायला हवा हे ही सांगेल. या मिररच्या स्क्रीनवर वेगवेगळे व्यायामप्रकार सुरू राहतील. हे व्यायाम बघून तुम्हीही व्यायाम करू शकता.

## अनोखे विक्रम

फन टाईम

मुलांनो, या जगात इतरांपेक्षा वेगळं करणाऱ्यांची कमतरता नाही. ही माणसं काही तरी जगावेगळं करून जातात. त्यांच्या या कामगिरीची नोंद गिनिज बुक, लिमका बुक घेतं. हे लोक विक्रमवीर बनतात. अर्थात फक्त माणसंच विक्रम करतात असं नाही तर प्राण्यांच्या नावेही विक्रमांची नोंद होते. अशाच काही विक्रम वीरांची ओळख करून घेऊ.

* जिफपॉम नावाचा गोंडस कुत्रा इंटरनेट सेन्सेशन आहे. इन्स्टाग्राम आणि फेसबुकवर तो अॅक्टिव्ह असतो. या कुत्र्याचे इन्स्टाग्रामवर ९० लाख फॉलोअर्स आहेत. जिफपॉमचं नाव गिनिज बुकमध्ये नोंदवण्यात आलं आहे.
* जेसिका कॉक्स ही पायलट आहे. पण तिला हात नाहीत. हात नसणारी ती जगातली एकमेव पायलट आहे. जेसिका पायांनी विमान चालवते. याच कारणामुळे तिचं नाव गिनिज बुकमध्ये नोंदवण्यात आलं आहे.



* अयोध्येत दीपोत्सवाचं आयोजन करण्यात आलं होतं. या वेळी पाच लाख ६१ हजार पणत्या लावण्यात आल्या होत्या.
* आयटीसी या कंपनीने सर्वात महागडं चॉकलेट तयार केलं. या चॉकलेटची किंमत प्रतिकिलो ४.३ लाख रुपये आहे.

## हासरा, नाचरा श्रावण

वाचा तर खरं

पंकजा देव

मित्रांनो, श्रावण हा सृष्टीचे अनुपम सौंदर्य दाखवणारा महिना आहे. तुम्ही तो अनुभवत असाल. सततच्या पावसामुळे धूळ आणि प्रदूषण स्थिरावते, हवेत ताजेपणा आणि शुद्धता वाढते. झाडे खूप हिरवीगार होतात आणि जास्त ऑक्सिजन सोडत असल्यामुळे सभोवतालची हवा श्वास घेण्यास अधिक चांगली होते. हे शुद्ध वातावरण आपल्या फुफ्फुसांसाठी आणि संपूर्ण शरीरासाठी खूप फायदेशीर आहे.

या काळात वातावरणातील आर्द्रता वाढत असल्यामुळे आपली पचन प्रक्रिया मंदावू शकते. म्हणूनच पूर्वजांनी या काळात हलक्या आणि सहज पचणाऱ्या अन्नावर भर दिला आहे. उपवास करणे आणि फळे खाणे हा शरीर आतून स्वच्छ करण्याचा आणि पचनसंस्थेला विश्रांती देण्याचा एक वैज्ञानिक मार्ग आहे. हा नियम पाळल्यास शरीराला बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्यास मदत होते.

पावसाळ्यात पाण्याशी संबंधित आजार वाढण्याचा धोका असतो. हे लक्षात घेऊन श्रावणात बरेच लोक उकळलेले पाणी पिण्याचा किंवा विशेष पदार्थ खाण्याचा आग्रह धरतात. पाण्यामुळे होणारे आजार



टाळण्याचा हा एक प्राचीन मार्ग आहे. मंदिरांमध्येही तुळशीचा वारंवार वापर आणि गंगाजलाचे महत्त्व पाणी शुद्ध ठेवण्याशी आणि त्याचे औषधी गुणधर्म वाढवण्याशीच जोडलेला आहे.

या महिन्यातील हिरवा निसर्ग, थंड वारा आणि पावसाचे थेंब हे मानसिक शांतीसाठी कोणत्याही औषधापेक्षा कमी नाहीत. श्रावण आपल्याला निसर्गाच्या जवळ जाण्याची संधी देतो. ध्यान, पूजा आणि भक्तिमय वातावरण ताण कमी करण्यास आणि मन शांत ठेवण्यास मदत करते. निसर्गाच्या सानिध्यात वेळ घालवल्याने आपला मूड सुधारत असल्याचे वैज्ञानिकदृष्ट्याही सिद्ध झाले आहे.

मुलांनो, पावसामुळे केवळ पृथ्वी हिरवीगारच होत नाही तर भूजल पातळी वाढण्याचा, पुनर्भरण करण्याचा हा एक महत्त्वाचा काळ आहे. या महिन्यात नद्या, तलाव आणि विहिरी पाण्याने भरतात. हे जलसंवर्धनाचे एक मोठे चक्र आहे.

## आंबा लंगडा कसा?

गप्पांगण

वीणा देशमुख

छोट्या दोस्तांनो, उन्हाळ्यात तुम्ही भरपूर आंबा खाल्ला असेल. हापूस, पायरी, रायवळ यासारख्या जातीचा आंबा तर तुम्हाला विशेष आवडत असेल. आंब्यामध्ये केसर, चौसा, तोतापुरी, मलगोबा, 'लंगडा आंबा' अशाही अनेक जाती आहेत. चला तर, आज 'लंगडा आंबा' या नावाचा इतिहास जाणून घेऊन या.



मित्रांनो, ही कहाणी आपल्याला वाराणसीच्या सुमारे ३०० वर्षांपूर्वीच्या रस्त्यांवर घेऊन जाते. त्यावेळी तेथील एका मंदिरात एक अपंग पुजारी राहत असे. त्याला लोक प्रेमाने 'लंगडा पुजारी' म्हणत. एके दिवशी एका संताने त्याला आंब्याच्या काही बिया दिल्या आणि मंदिराजवळ पेरण्यास सांगितले. त्यावेळी त्याने प्रतिज्ञा केली की, या झाडावर फळे येतील तेव्हा प्रथम देवाला अर्पण केली जातील आणि नंतर भक्तांमध्ये वाटले जातील.

काही वर्षांमध्ये त्या झाडाला आंबे लागले तेव्हा अप्रतीम चवीने सर्वांचेच मन जिंकले. ते आंबे इतके गोड, रसाळ आणि सुगंधी होते सगळ्यांना कमालीचे आवडले. तथापि, आता समस्या होती की, अशा खास आंब्याला नाव काय द्यायचे? लोकांनी विचारले की, हा आंबा कुठून आला, तेव्हा उत्तर आले ते त्या 'लंगडा पुजारी'च्या झाडावरून...

बस्स, मग काय... या आंब्याला त्या पुजाऱ्याचेच नाव मिळाले. 'लंगडा आंबा'. हे नाव थोडे वेगळे असले तरी त्याची चव इतर आंब्यांपेक्षा खास असते. आता ही जात वाराणसीची शान बनली असून देशभर त्याला मोठी मागणी असते.

केवळ चवीसाठीच नाही तर आरोग्यासाठीही लंगडा आंबा फायदेशीर आहे. त्यात व्हिटॅमिन सी, फायबर, अँटीऑक्सिडंट्स आणि मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असते. आयुर्वेदानुसार, हा आंबा शरीराच्या अनेक समस्यांना आराम देतो. तो हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर मानला जातो. यातील पोषक तत्त्वे रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करतात. त्यात असणारे फायबर पचन सुधारते आणि बद्धकोष्ठता, गॅस सारख्या समस्या दूर करते. तेव्हा पुढल्या वर्षी या जातीचा आंबा नक्की खा.

## ठिपके जुळवा



## कार्टोग्राफीचा विचार करा

कोण होणार?



सध्या विविध क्षेत्रांमध्ये कारकिर्दीच्या संधी निर्माण झाल्या आहेत. त्यापैकी एक क्षेत्र आहे कार्टोग्राफीचं. हे कार्टोग्राफर्स वेगवेगळ्या प्रकारचे नकाशे म्हणजे मॅप्स तयार करतात. आज स्मार्टफोन वापरणारा प्रत्येकजण गूगल मॅप्सचा वापर करतो. जग जवळ येत आहे. इंटरनेटच्या वाढत्या प्रभावामुळे डाटा जपून ठेवण्याची गरज निर्माण झाली आहे. डिजिटल व्यासपीठांवर हा डाटा जपून ठेवला जातो. या क्षेत्रातही तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. म्हणूनच हे क्षेत्र कारकिर्दीच्या असंख्य संधी उपलब्ध करून देत आहे.

या क्षेत्रात कारकिर्द करण्यासाठी तुम्ही कार्टोग्राफी, जिओग्राफी किंवा या क्षेत्राशी संबंधित कोणत्याही विषयात पदवी मिळवू शकता. कार्टोग्राफी, जिओग्राफीमध्ये डिप्लोमा, मास्टर्स, एमफील किंवा पीएचडीसारखे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पर्यावरण आणि भूगोल या विषयांची गोडी असायला हवी. यासोबतच गणितावर प्रभुत्व असणं आवश्यक आहे. लेआउट, डिझायनिंगमध्ये गती असायला हवी. कार्टोग्राफीचं शिक्षण घेतल्यानंतर तुम्ही सरकारी विभागांसह संशोधन संस्थांमध्ये काम करू शकता. जीआयएस तसंच रिमोट सेन्सिंग टेक्नॉलॉजीचा वापर करणाऱ्या संस्थांनाही या तज्ज्ञांची गरज असते.

## रेल्वे ट्रॅकमध्ये दगड कशासाठी?

माहिती असावे

उर्मिला राजोपाध्ये

छोट्या मित्रांनो, तुम्ही कधी रेल्वे ट्रॅककडे बारकाईने पाहिले असेल तर दिसले असेल की, रुळांच्या मध्ये आणि खाली छोटे दगड ठेवलेले असतात. यामागचे कारण आज जाणून घेऊ या.



मुलांनो, या दगडांना 'बॅलास्ट' म्हणतात. रेल्वे ट्रॅकच्या स्थिरतेसाठी, सुरक्षिततेसाठी आणि दीर्घायुष्यासाठी ते आवश्यक असतात. तुम्ही जाणता की, ट्रेनचे वजन खूप जास्त असते. स्वाभाविकच ट्रेन वेगाने धावताना रुळांवर प्रचंड दाब असतो. मात्र हे बॅलास्ट दगड रुळांना घट्टपणे जागी ठेवतात. ते एकमेकांशी जोडले जाऊन एक मजबूत आधार तयार करत असल्यामुळे रुळ हलत नाहीत. हे दगड नसतील तर रुळ हलू किंवा वाकडे होऊ शकतात. यामुळे अपघातांचा धोका वाढतो. दुसरे म्हणजे ट्रेनचे वजन थेट रुळांवर पडत असले तरी या दगडांमुळे ते पसरते आणि नंतर जमिनीवर प्रसारित होते. यामुळे रुळांवर असमान दाब पडू शकत नाही आणि ते बराच काळ टिकतात.

हे दगड ठेवले नाहीत तर रुळ जमिनीत धसू शकतात किंवा तुटू शकतात. पावसाळ्यात रुळांभोवती पाणी साचते. त्यामुळे रुळ गंजण्याचा किंवा कमकुवत होण्याचा धोकाही असतो. पण या दगडांमध्ये अंतर असल्यामुळे पाणी सहजपणे बाहेर पडते आणि रुळ कोरडे राहतात. म्हणजेच ही ड्रेनेज प्रणाली रेल्वे ट्रॅकला पाणी साचण्यापासून आणि धूप होण्यापासून वाचवते.

तिसरी बाब म्हणजे ट्रेन जाताना कंपनं तयार होतात आणि आवाज निर्माण होऊ शकतो. मात्र हे दगड कंपने शोषून आवाज कमी करण्याचे कामही करतात. दगड नसतील तर ट्रेन चालताना जास्त आवाज करेल आणि आजूबाजूच्या भागात ध्वनी प्रदूषण वाढेल. उन्हाळ्यात आणि हिवाळ्यात धातूचे ट्रॅक विस्तारतात आणि आकुंचन पावतात. असे असताना बॅलास्ट स्टोन रुळांना लवचिकता देतात आणि तापमानातील बदलांमुळे होणाऱ्या विस्तार किंवा आकुंचनाचे संतुलन साधतात. यामुळे रुळांमधील भेगा पडण्यास प्रतिबंध होतो आणि ते दीर्घकाळ सुरक्षित राहतात.




### दोस्त हे मस्त

#### अशी असतात छोटुली पिल्लं



छोट्यांनो, प्राण्यांची पिल्लं खूप गोंडस असतात. नुकत्याच जन्मलेल्या हत्तीच्या पिल्लाचं वजन जवळपास ११२ किलो तर लांबी ८३ सेंटीमीटरच्या आसपास असते. एकशिंगी गेंड्याच्या पिल्लाच्या नाकावर लहानपणी शिंग नसतं. पिल्लू मोठं झाल्यावर हे शिंग विकसित होतं. सीलच्या पिल्लाला 'पप्स' असं म्हणतात. गंमत म्हणजे ही पिल्लं जन्मल्यावर लगेच पोहू शकतात. पांडाच्या पिल्लांचं वजन खूपच कमी म्हणजे जवळपास १०० ग्रॅमच्या आसपास असतं. कुत्र्याच्या पिल्लांना जन्मल्यानंतर जवळपास दोन आठवडे दिसत नाही तसंच ऐकूही येत नाही.

### खादाडी

#### गरमागरम चीझी राउंड



दोस्तांनो, चीझ राउंड हा पदार्थ एकदा बनवून बघा. यासाठी चार बटाटे उकडून घ्या. पाव कप बटर, किसलेलं अर्धा कप चीज, पाव कप कांद्याची पात, चमचाभर चिली फ्लेक्स, बटाट्यांचे गोलाकार काप एकत्र करून घ्या. यानंतर मायक्रोवेव्ह २०० अंशात प्री हिट करून घ्या. बटाट्याच्या चकत्यांच्या दोन्ही बाजूंना बटर लावून घ्या. आता बेकिंग ट्रे घ्या. त्यावर कुकीज शीट ठेवा. त्यावर बटाट्याचे काप ठेवा. यानंतर बटाट्यावर किसलेलं चीज घाला. थोडा वेळ मायक्रोवेव्हमध्ये ठेवा. चीज वितळल्यावर बेकिंग ट्रे बाहेर काढा. त्यावर कांद्याची पात घाला. वरून चिली फ्लेक्स भुरभुरा. हे चीज राउंड सॉससोबत खा.

### स्टडी टिप्स

#### अभ्यासाची शास्त्रीय पद्धत

छोट्यांनो, अभ्यासाच्या वैज्ञानिक पद्धती आहेत. या पद्धतींनी अभ्यास केल्यास बरेच लाभ होऊ शकतात. एकाच विषयाचा अभ्यास वेगवेगळ्या ठिकाणी केल्यामुळे अधिक चांगल्या प्रकारे लक्षात राहू शकतो. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी गेल्यामुळे आपला मेंदू एकच माहिती वेगवेगळ्या पद्धतींनी साठवून ठेवतो. यामुळे स्मरणशक्ती सुधारते. हा प्रयोग करून बघायला हरकत नाही.



### योगा टाईम

#### करा हे आसन

मुलांनो, पावसाळ्याच्या दिवसात तुम्ही वेगवेगळी आसनं करू शकता. यापैकीच एक म्हणजे सुप्त मत्स्येंद्रासन. हे आसन पलंगावर झोपूनही करता येतं. ते केल्याने पाठीचा कणा बळकट होतो. शिवाय स्नायूंची क्षमता वाढते. तेव्हा हे आसन करा आणि तंदुरुस्त रहा.



# जागतिक दर्जाचे संस्कृत विद्यापीठ उभारणार

**मुख्यमंत्री फडणवीस यांची ग्वाही ■ डॉ. केशव बळीराम हेडगेवार आंतरराष्ट्रीय गुरुकुल व आंतरराष्ट्रीय शैक्षणिक भवनाचे लोकार्पण**







■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि.१:** जगातील अनेक जुन्या संस्कृती कालागणिक व्यपगत झाल्या, नामशेष झाल्या परंतु भारतीय संस्कृतीला सनातन स्वरुपात टिकून राहता आले. हे मोलाचे कार्य संस्कृत भाषेच्या माध्यमातून शक्य झाले. स्थापत्य, आयुर्वेद, खगोल, गणित, रसायन आदी ज्ञानशाखेतील ज्ञानभंडार संस्कृत भाषेमध्ये असून त्याला समाजापुढे नेण्यासाठी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय मोलाची भूमिका बजावेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

डॉ. केशव बळीराम हेडगेवार अंतरराष्ट्रीय गुरुकुल व अंतरराष्ट्रीय शैक्षणिक भवनाचे लोकार्पण व विद्यार्थी भवनाचे भूमीपूजन आज वारंगा येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, वित्त राज्यमंत्री ॲड. आशिष जायस्वाल, कुलगुरु हरेराम त्रिपाठी, संस्थापक कुलगुरू डॉ पंकज चांदे व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

संस्कृत भाषेचे विद्यापीठ साकारण्यासाठी डॉ. श्रीकांत जिचकार व माजी संस्थापक कुलगुरु डॉ. पंकज चांदे यांनी दिलेल्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख फडणवीस यांनी केला. कविकुलगुरु कालिदास यांच्या नावाने हे विद्यापीठ असल्याने ते रामटेक येथे व्हावे अशी सुरुवातीला संकल्पना होती. तथापि संस्कृत भाषेच्या या ज्ञानपिठाला वैश्विक स्तरावर पोहचणे सुलभ व्हावे यासाठी नागपूर पासून जवळ असलेल्या वारंगा येथे हे संपूर्ण ज्ञानसंकुल विकसित करण्याचा निर्णय घेतला. येथे शेजारीच असलेल्या नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीच्या धर्तीवर येत्या काळात निश्चित कालमर्यादेत जागतिक पातळीवरचे संस्कृत विद्यापीठ उभारु असेही मुख्यमंत्री म्हणाले.

भारतीय संस्कृती, भारतीय जीवनमूल्य, भारतीय जीवनपद्धती याला अधोरेखित करुन यातील जीवनमूल्य सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावेत यासाठी डॉ. हेडगेवार यांनी दिलेले योगदान अमूल्य असल्याचे त्यांनी सांगितले. संस्कृत ज्ञान भाषेतील हे मूल्य नव्या पिढीपर्यंत पोहोचले पाहिजे. ती आपली ज्ञानभाषा आहे. १०२ अब्ज ७८ कोटी ५० लाख एवढी शब्दसंख्या संस्कृतमध्ये आहे. जगातील समृद्ध भाषा म्हणून संस्कृतकडे पाहिले जाते. या विद्यापिठाच्या माध्यमातून आपण संस्कृतला अधिक समृद्ध करु या असे त्यांनी सांगितले.

संस्कृत भाषेचा गुणगौरव करताना शेवटी फडणवीस यांनी एक खंतही व्यक्त केली. फडणवीस म्हणाले, एक मनातील गोष्ट सांगूनच टाकतो. मी संस्कृत शिकू शकलो नाही याची मला कायम खंत वाटत राहते. माजी आई एम.ए. संस्कृत आहे. ती असखलीतपणे संस्कृत बोलते. पण मी संस्कृत शिकू शकलो नाही. एका मोठ्या ज्ञानापासून वंचित राहिलो. पुढे ही भाषा शिकण्याचा प्रयत्न निश्चित करेल. पण जे ही भाषा शिकू इच्छितात त्यांच्यासाठी काम करणाऱ्या विद्यापीठाला तेथील विकासासाठी योगदान देऊन त्याचा भार उचलण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

**संस्कृत लोकाश्रितही व्हावी**

आजच्या जागतिक परिभाषेत ग्लोबलची भावना व वसुधैव कुटुंबकम एकच आहे. वसुधैव कुटुंबकम याचा पाया समृद्ध आहे. संस्कृत भाषेने दिलेले हे ज्ञानाचे बळ जर आपल्याला समजून घ्यायचे असेल तर त्यातील भावही आपल्या लक्षात आले पाहिजे. त्यासाठी भाषा आवश्यक असते. अनेक ज्ञानाचे भांडार संस्कृत भाषेतील पाठ, स्त्रोत्र यांच्या माध्यमातून अनेक घरात पोहचले असले तरी संस्कृत भाषा आता राजाश्रित होण्यासह लोकाश्रितही झाली पाहिजे, असे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत म्हणाले.

आत्मनिर्भर भारताच्या उभारणीसाठी हाच खरा महत्वाचा काळ आहे. यासाठी आपले सत्व मोलाचे आहे. स्वनिर्भरता ही या सत्वावर अवलंबून असते. बळही यासाठी आवश्यक असते. कोणत्याही बळाच्या पाठीमागे चित्त, मन व बुद्धी स्वाभिमानी असली की असे बळ अधिक विधायक ठरते असे त्यांनी सांगितले.

सत्त्व आणि बळ जिथे असते तिथे ओज येते. ओजापाठोपाठ लक्ष्मीचाही तिथे वास निर्माण होतो या शब्दात त्यांनी समृद्ध भारताची भूमिका त्यांनी विषद केली. आजच्या भवतालाची ही गरज आहे. यासाठी प्रत्येकाने आपले बळ दिले पाहिजे. या बळाच्या पाठीमागे जे चित्त आहे, मन व बुद्धी आहे ती तेवढीच स्वाभिमानी ठेवून प्रल्हादने इंद्राला दिलेल्या सत्त्वाचे स्मरण केले पाहिजे असे ते म्हणाले. हे सत्व आपल्याला अधिक कळण्यासाठी संस्कृत भाषा हा मुख्य आधार आहे. संस्कृत भाषा व यातील ज्ञानाची शक्तीस्थळे आपण समजून घेतली पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

कुलगुरु आचार्य हरेराम त्रिपाठी यांनी आपल्या प्रास्ताविकात विद्यापिठामार्फत राबविलेल्या उपक्रमाची माहिती दिली. माजी कुलगुरु आचार्य उमा वैद्य, कुलसचिव देवानंद शुक्ल, अभिनव भारतीचे संचालक प्रो. कृष्णकुमार पाण्डेय यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## डान्स बार चालवणाऱ्या गृहराज्यमंत्र्याने राजीनामा द्यावा विजय वडेट्टीवारांची मागणी




■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि.१:** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यावर पुन्हा एकदा गंभीर आरोप करत थेट राजीनाम्याची मागणी केली आहे.

वडेट्टीवार यांनी एक्स (पूर्वीचे ट्विटर) या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून जोरदार हल्ला चढवत म्हटले,ह्लकरून करून भागले, आता देवपूजेला लागले? राज्याचे गृहराज्यमंत्री आईच्या नावावर डान्स बार चालवतात, हे उघड झाल्यावर नाही म्हणतात आणि हळूच डान्स बारचा ऑर्केस्ट्रा परवाना परत करतात. या वक्तव्यातून गृहराज्यमंत्री योगेश कदम थेट डान्स बार व्यवसायाशी संबंधित असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला असून, त्यांनी कदमांच्या राजीनाम्याची मागणीही केली आहे.

वडेट्टीवारांनी सवाल केला की, स्वतः कायदा सुव्यवस्था न पाळणारे गृहराज्यमंत्री इतरांवर काय धाक ठेवणार? त्यांनी परवाना रद्द केला म्हणजे क्लिनचीट मिळाली का? या आरोपांमुळे शिंदे गट आणि महायुती सरकार अडचणीत सापडण्याची शक्यता आहे.

काँग्रेस, राष्ट्रवादी, आणि शिवसेना (ठाकरे गट) या मुद्द्यावर आक्रमक होत आहेत. मंत्री पदाचा दुरुपयोग करत डान्स बार परवाने घेण्याचा आरोप सरकारसाठी डाग बनू शकतो.

सूत्रांच्या माहितीनुसार, योगेश कदम यांच्या आईच्या नावावर असलेला डान्स बारचा परवाना मागे घेण्यात आला आहे. मात्र, हे प्रकरण समोर येताच हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न सुरु झाल्याचा आरोप वडेट्टीवारांनी केला आहे.

गृहमंत्रालयाच्या जबाबदारीवर असलेल्या मंत्र्यांकडून अशा प्रकारच्या वागणुकीमुळे कायदा-सुव्यवस्थेचा वाभाडा निघाला आहे, असं वडेट्टीवारांचे म्हणणं आहे. त्यामुळे राजकीय दबाव वाढण्याची शक्यता आहे. आरोपांमुळे माणिकराव कोकाटे यांचे कृषीखाते बदलले गेले. शिंदेसेनेतील काही मंत्री टार्गेटवर आहेत. आता योगेश कदम यांचे हे प्रकरण कोणते वळण घेणार, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## साप्ताहिक संवाद : भारतीय निर्यातीवर शुल्कभार आणि दंडही



लोकरंग

भारतातून, १ ऑगस्टपासून होणाऱ्या निर्यातीवर २५ टक्के आयातशुल्क आणि भारताने रशियाशी व्यापार केल्याबद्दल दंड लादण्याची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी केली. सध्या दोन्ही देशांदरम्यान व्यापार कराराबाबत वाटाघाटी सुरू असतानाच हा निर्णय जाहीर करण्यात आला आहे.

मात्र, वाढीव आयातशुल्क मूळ १० टक्के शुल्कापेक्षा वेगळे असणार का? आणि दंडाचे प्रमाण किती असेल? हे अद्याप स्पष्ट करण्यात आलेले नाही.याच अनुषंगाने उद्योजक शंतनू भडकमकर यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

○ अमेरिकेने २५ टक्के वाढीव आयातशुल्काचा भारतावर लादलेल्या निर्णयाचा भारतावर काय परिणाम संभवतो?

■ सध्याच्या आयातशुल्कापेक्षा वाढीव आयातशुल्क भारतावर लादण्याचे समर्थन करताना, 'भारत बहुतांश लष्करी सामग्री आणि तेल रशियाकडून आयात करतो,' असे कारण ट्रम्प यांनी दिले आहे. याखेरीज भारतातील निर्बंध, परवाने पद्धत आदी अडथळेही आहेत, असेही ट्रम्प यांनी म्हटले आहे.

आपल्या एकूण निर्यातीपैकी अमेरिकेला केल्या जाणाऱ्या निर्यातीचे प्रमाण १५ ते १६ टक्के आहे. त्यामुळे अमेरिकेच्या लहरीपणाचा फटका आपल्या उद्योगांना फारसा बसणार नाही. त्यासाठीच केंद्र सरकार सध्या शांत आहे. सर्व परिस्थिती पुरेशा पोक्तपणे सरकार हाताळत आहे.

○ या आयातशुल्का संदर्भात भारत अमेरिका या देशांमध्ये काय करार झालेला आहे?

■ पुढील महिन्यात अमेरिकेचे शिष्टमंडळ व्यापार कराराच्या वाटाघाटी करण्यासाठी भारतात येणार आहे. दोन्ही देशांत आतापर्यंत वाटाघाटीच्या पाच फेऱ्या पार पडल्या आहेत. या करारामध्ये अमेरिकेच्या फायद्याच्या कलमांना भारताने मंजुरी द्यावी, यासाठी दबावतंत्र म्हणून हे वाढीव आयातशुल्क लादण्यात आले असावे, असे मानले जात आहे.

अमेरिकेने भारतीय आयात मालावर २५ टक्के शुल्क आकारण्याच्या वक्तव्याची नोंद भारताने घेतली असून, या निर्णयाचे नेमके काय परिणाम होतील याचा आढावा, वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय घेणार आहे. दोन्ही देशांमध्ये सुरू असलेल्या व्यापार चर्चांचा उल्लेख करून, न्याय्य, संतुलित आणि परस्पर लाभदायक कराराच्या दिशेने ही वाटचाल होत आहे, असेही मंत्रालयाने नमूद केले.

○ अमेरिकेच्या या आयातशुल्क वाढीसंदर्भात भारतीय निर्यातदारांची काय भूमिका आहे?

■ घाऊक प्रमाणावरील निर्यातीवर थोडा होईल. पोलाद आणि औषधे यांची निर्यात अमेरिकेला एकगठ्ठा किंवा बल्क प्रमाणावर होते. ही निर्यात करणारे निर्यातदार सध्या 'थांबा आणि वाट पाहा' या स्थितीत 'जैसे थे' आहेत. सध्यातरी 'जैसे थे' राहण्याकडे या निर्यातदारांचा कल दिसतो आहे. उद्योगांच्या (एमएसएमई) कल्याणाचे रक्षण आणि संवर्धन करणे याला सरकारचे सर्वोच्च प्राधान्य आहे. राष्ट्रीय हिताचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना सरकार करील. यामध्ये ब्रिटनसोबतचा नुकताच झालेला व्यापक आर्थिक व व्यापार करारही समाविष्ट आहे.

■ ■ ■

### निओ सेमी एसजीमध्ये इक्विटी शेअर्सच्या अधिग्रहणासाठी एमआयसी इलेक्ट्रॉनिक्सची मान्यता

एलईडी व्हिडिओ डिस्प्लेच्या डिझाइन, विकास आणि उत्पादनात जागतिक आघाडीवर असलेल्या एमआयसी इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड कंपनीनेने त्यांच्या बोर्डाने सिंगापूरमधील उच्च-वाढी, नाविन्यपूर्ण-चालित कंपनी निओ सेमी एसजी प्रा. लि. (एनएसपीएल) मध्ये इक्विटी शेअर्सच्या अधिग्रहणाचा शोध घेण्यासाठी तत्वतः मान्यता दिली आहे.

हे धोरणात्मक पाऊल कंपनीच्या पुढील पिढीतील तंत्रज्ञान आणि मजबूत वाढीच्या मार्गासह संलग्न डोमेनमध्ये प्रवेश दर्शवते.एनएसपीएलने सिलिकॉन व्हॅली यूएसए-आधारित सेमीकंडक्टर चिप डिझाइन आणि प्रगत आयपी मालमत्ता असलेल्या फॅबलेस कंपनीसोबत सामंजस्य कराराद्वारे एक अद्वितीय आणि भविष्यासाठी तयार इकोसिस्टम तयार केले आहे आणि उच्च-कार्यक्षमता संगणन, एआय आणि आयओटी अनुप्रयोगांसाठी अत्याधुनिक सिलिकॉन सोल्यूशन्स विकसित करत आहे, ही ऊर्जा व्यवस्थापन कंपनी हवामान लवचिकता, ऊर्जा कार्यक्षमता आणि स्मार्ट ग्रिड आधुनिकीकरणावर लक्ष केंद्रित करून एकात्मिक आयओटी-आधारित उपाय ऑफर करते.

हे जागतिक शाश्वतता उद्दिष्टे आणि निव्वळ-शून्य उत्सर्जना कडे संक्रमणास समर्थन देते.

कंपनी यूएई स्थित उपकंपनीद्वारे पोर्टफोलिओमधील पर्यावरणीय आणि वर्तुळाकार अर्थव्यवस्थेच्या दोन्ही आवश्यकतांना संबोधित करून ई-कचरा व्यवस्थापन क्षेत्रात प्रवेश करण्यास सज्ज आहे.

हे प्रस्तावित अधिग्रहण एमआयसी इलेक्ट्रॉनिक्सच्या दीर्घकालीन धोरणाशी सुसंगत आहे जे उच्च तंत्रज्ञान क्षेत्रात विविधता आणण्यासाठी आणि सेमीकंडक्टर, हरित ऊर्जा आणि डिजिटल सेवा पायाभूत सुविधांसारख्या महत्त्वाच्या वर्टिकलमध्ये त्याची उपस्थिती मजबूत करण्यासाठी आहे. यामुळे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये महत्त्वपूर्ण मूल्य निर्मिती संधी उघडण्याची अपेक्षा आहे. हा व्यवहार सेबी-नोंदणीकृत मूल्यमापनकर्त्यांद्वारे एमआयसी इलेक्ट्रॉनिक्स आणि एनएसपीएल दोन्हीचे स्वतंत्र मूल्यांकन, व्यापक कायदेशीर, तांत्रिक, व्यावसायिक आणि आर्थिक योग्य परिश्रम, व्यवहार समाविष्ट आहे. ■ ■

### निसर्गसंपन्न कोकण

मुंबईपासून गोव्यापर्यंत किनाऱ्यावर पसरलेल्या कोकणात सुंदर समुद्र किनारे, भव्य पुरातन अवशेष आणि बरेच काही आहे. तुम्ही कधी कोकण किनाऱ्यावर ट्रेनने प्रवास केला असेल तर हे ठिकाण किती सुंदर आहे हे तुम्हाला कळेलच. कोकणात भेट देण्यासारखी बरीच ठिकाणे आहेत जिथे तुम्ही कुटुंबाबरोबर सुट्टीचा आनंद घेऊ शकता. धबधबे, डोळ्यांचे पारणे फिटणारे निसर्गसौंदर्य आणि स्वादिष्ट सीफूडचे माहेरघर असल्याने, कोकण किनारपट्टीवरील अनेक पर्यटन स्थळांना तुम्ही भेट देऊ शकता. गणपतीपुळ्यात प्राचीन समुद्रकिनारे, वृक्षवल्ली व खारफुटीचे निसर्गसौंदर्य अनुभवायला मिळते. अरबी समुद्राच्या स्वच्छ निळ्याशार पाण्याचे सौंदर्य या ठिकाणाच्या सौंदर्यात आणखी भर घालते. येथील दोन विदेशी समुद्र किनारे गणपतीपुळे बीच आणि आरे वारे बीच हे प्रसिद्ध आहेत. याशिवाय प्राचीन गणपती मंदिर, जयगड किल्ला आणि ब्रिटीश काळात बांधलेल्या दीपगृहाला नक्की भेट द्यावी. अलिबाग तुम्हाला पश्चिम किनाऱ्यावरील काही अत्यंत प्रतिष्ठित किल्ल्यांचा अनुभव घेण्याची संधी देते. जर तुम्ही कोकणात भेट देण्यासाठी सर्वोत्तम ठिकाणे शोधत असाल तर तुम्ही अलिबाग किल्ला आणि मॅगेन अवोट सिनेगॉगला नक्कीच भेट द्या. येथील सिद्धेश्वर मंदिर आणि कनकेश्वर मंदिर या दोन्ही ठिकाणी वर्षभर हजारो भाविक येतात. काशीद बीच, कोरलाई बीच, नागाव बीच, आक्षी बीच इत्यादींसह येथील काही बीचवर तुम्ही फिरायला जाऊ शकता. ■



: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

## 'त्या' मुलीवर ४० तासानंतर अंत्यसंस्कार

■ **महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १ :** मेळघाटातील नागापूर येथील अनुदानित आश्रमशाळेत पाण्याच्या टाकीची भिंत कोसळून एका १४ वर्षीय विद्यार्थिनीचा मृत्यू झाला. ही घटना २९ जुलैला सायंकाळी घडली होती.

दरम्यान मृत विद्यार्थिनीच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत द्यावी, या मागणीसाठी माजी आमदार राजकुमार पटेल यांनी ३० जुलैला मृतदेह ताब्यात घेऊन धारणी येथील आदिवासी विकास विभागाच्या प्रकल्प संचालक कार्यालयात नेण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी त्यांचा पोलिसांसोबत वाद झाला. त्यामुळे बुधवारी रात्रीच पोलिसांनी राजकुमार पटेल यांना त्यांच्या मुलासह डिटेन केले होते.

दरम्यान, ४० तासानंतर गुरुवारी मृत विद्यार्थिनीच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. तसेच राजकुमार पटेलांसह सात जणांविरुद्ध चिखलदरा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सुमरती सोमा जामुनकर (१४) असे मृत विद्यार्थिनीचे नाव आहे.

ती व तिच्या काही मैत्रिणी पाणी पिण्यासाठी गेल्या असता शाळेतील पाण्याच्या टाकीची भिंत पडली. या वेळी मलब्याखाली दबल्याने सुमरतीचा मृत्यू झाला तर तिच्या तीन मैत्रिणी जखमी झाल्या.

दुसरीकडे, माजी मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी चिखलदरा पोलीस स्टेशनमध्ये ठिय्या दिला आश्रमशाळेचे सचिव भाजप आमदारावर गुन्हे दाखल करा, अशी मागणी करीत अनेक तास त्यांनी ठाण्यात आंदोलन केले.

## तलावाची पार फुटली ४५० एकर शेती जलमय



■ **महासागर प्रतिनिधी भंडारा, दि. १ :** जिल्ह्याच्या साकोली येथील लघु पाटबंधारे जिल्हा परिषदेच्या तलावाची पाळ फुटल्याने परिसरात पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या घटनेमुळे साकोली आणि गडकुंभली गावातील अंदाजे ३०० ते ४५० हेक्टर शेती जलमय झाली असून, शेत पिकांचे मोठे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. यामुळे साकोली-चंद्रपूर राज्य महा मार्गही पूर्णपणे ठप्प झाला आहे.

साकोली शहराच्या अगदी जवळ असलेल्या या ऐतिहासिक तलावाची पार आज १ ऑगस्टच्या पहाटे फुटली. या घटनेने संपूर्ण साकोली शहर हादरले असून, दोन घरांमध्ये पाणी शिरले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र शेतक?यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

या घटनेबाबत स्थानिक नागरिकांनी आणि माजी नगरसेवक ॲड. मनिष कापगते यांनी प्रशासनावर गंभीर आरोप केले आहेत. कापगते यांच्या मते, तलावाच्या सौंदर्यीकरणाच्या नावाखाली बांधकाम विभागाने पिचिंगचे दगड जेसीबीने काढल्याने तलावाची पार कमकुवत झाली आणि ही दुर्घटना घडली.

मुख्याधिकारी मंगेश वासेकर आणि पोलिस निरीक्षक महादेव आचरेकर यांनी पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे.

## ८ जणांना गंडवणारी लुटेरी दुल्हन नवव्या पतीसोबत जेरबंद

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :** चहा बनवण्याची अनोखी शैली, लक्षवेधी वेशभूषा, कपात चहा ओतण्याचा रजनिकांत स्टाईल अंदाजामुळे समाज माध्यमांवर लोकप्रिय डॉली चायवाला हे नागपूरमधील सिव्हिल लाईन्समध्ये अनेकांचा अड्डा झाला आहे.

आठ जणांना कोट्यवधीने गंडा घालणारी लुटेरी दुल्हन समीरा फातिमा याच डॉली चायवालाच्या टपरीवर पोहचली आणि गिट्टीखदान पोलीसांनी या लुटेरी दुल्हनला नवव्या पती सोबत ताब्यात घेतले.

लुटेरी दुल्हन या नावाने कुप्रसिद्ध समीराने २०१० पासून आतापर्यंत ८ जणांसोबत निकाह करीत त्यांना लाखोंचा गंडा घातला आहे. नवव्या पतीसोबत ती अखेर डॉलीच्या टपरीवर हाती लागल्याची माहिती मिळताच फसवणूकीला बळी पडलेल्या आठ पतींनी गुट्टीखदान पोलिसांचे आभार मानले.

आठ जणांना गंडा घालणारी ही लुटेरी दुल्हन डॉलीच्या टपरीवर आल्याचा सुगावा गिट्टीखदान पोलीस उपनिरीक्षक शारदा भोपळे त्यांना लागला होता. भोपाळे या पथकासह तेथे पोचल्या. त्यावेळी ही लुटेरी दुल्हन सिव्हिल लाईन्स मधील डॉलीच्या टपरीवर दुपारी २:३० वाजता नवव्या पतीसोबत चहाचे झुरके मारून बाहेर पडताना पथकाने तिला बेड्या ठोकल्या. विशेष म्हणजे भोपळे यांची टीम गेल्या दीड वर्षांपासून तिच्या मागावर होती. लुटेरी दुल्हन नावाने कुप्रसिद्ध फातीमाने आतापर्यंत इम्रान अंसारी, नजमुम साकीब, रहेमान शेख, मिर्झा अशरफ बेग, मुदस्सीर मोमिन, मोहम्मद तारिक अनिस, अमानुल्लाह खान, गुलाम गौस पठाण आणि आणखी एक अशा आठ जणांशी निकाल करीत त्यांना कोट्यवधींचा गंडा घातला आहे. तिला ताब्यात घेतल्यानंतर गिट्टीखदान पोलिसांनी न्यायालयासमक्ष उभे केले. न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली. त्यामुळे फातिमाला आता सरकारी सासुरवाडीचा पाहुणचार मिळणार आहे.

रंगीबेरंगी केस, स्टायलिश कपडे, मोठे गॉगल्स आणि रजनीकांतच्या अंदाजात चहा ओतणे ही डॉली चहा वाल्याची ओळख आहे. डॉली की टपरी या नावाने प्रचलित त्याच्या चहाच्या गाड्यावर रोज शेकडो ग्राहक येतात. युट्युबवर त्यांचा चॅनेल असून त्याला १३ लाखांहून अधिक सदस्य आहेत.



इंस्टाग्रामवरही त्यांचे लाखो फॉलोअर्स आहे. फेब्रुवारी २०२४ मध्ये त्यांची ओळख आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचली, जेव्हा मायक्रोसॉफ्टचे सहसंस्थापक बिल गेट्स त्यांच्या टपरीवर चहा प्यायला आले. गेट्स यांनी स्वतः हा व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आणि त्यानंतर डॉली चायवाला रातोरात चर्चेत आले.

ते दररोज सुमारे ५०० ते ६०० कप चहा विकतात आणि महिन्याला अंदाजे दीड लाख रुपयांपर्यंत कमाई करतात. डॉलीचा हाच मोह लुटेरी दुल्हन फातीमाच्या अंगलट आल्याची आता चर्चा आहे.